
मंगळवार, १२ जुलै २०२२
# राम प्रहर
◆ वर्ष १४ ◆ अंक ३५५
www.ramprahar.com
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## जेईई मुख्य परीक्षेत अद्व्य क्रिष्णा राज्यात पहिला



**नागपूर :** नॅशनल टेस्टिंग एजन्सीने (एनटीए) जेईई मुख्य परीक्षा-२०२२ सत्र १च्या निकालाची घोषणा सोमवारी (दि. ११) केली. या परीक्षेत महाराष्ट्रातून नागपूरचा अद्व्य क्रिष्णा हा विद्यार्थी पहिला आला आहे. त्याला ९९.९९८४४९ पर्सेन्टाईल मिळाले आहे. मूळचा उत्तर प्रदेश येथील असलेला अद्व्य हा जैन इंटरनॅशनल शाळेचा विद्यार्थी असून त्याने सीबीएसई बारावीची परीक्षा दिली आहे. अद्व्यने दहावीत होणाऱ्या राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षेतही यश मिळवले होते. दरम्यान, एनटीए जेईई मुख्य परीक्षा सत्र २ ही परीक्षा २१ ते ३० जुलै या कालावधीत होईल. सत्र २ची परीक्षा पास झाल्यानंतर कौन्सिलिंगसाठी 'ऑल इंडिया रँक' आणि 'कट ऑफ' जाहीर होणार आहे.

### अंतरंग
आदित्य ठाकरेंवर गुन्हा दाखल करण्यासाठी पोलिसांना नोटीस/२
खालापुरातील नढाळ येथे मुलाने घेतला बापाचा जीव/५
९४ वर्षीय आजीबाईंना जागतिक स्पर्धेत 'सुवर्ण'/८

# शिवसेना खासदारही बंडखोरीच्या मार्गावर

## उद्धव ठाकरेंनी बोलावलेल्या बैठकीकडे काहींची पाठ

**मुंबई : प्रतिनिधी**

राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत शिवसेनेच्या भूमिकेवर चर्चा करण्यासाठी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सोमवारी (दि. ११) पक्षाच्या खासदारांची बैठक मातोश्री निवासस्थानी बोलावली होती, मात्र या बैठकीस सुमारे सात खासदार गैरहजर राहिल्याने आता शिवसेना आमदारांपाठोपाठ खासदारही बंडखोरी करणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे.



शिवसेना नेते एकनाथ शिंदेंसोबत पक्षाच्या ४० आमदारांनी बंडखोरी केल्यानंतर शिवसेनेत मोठी फूट पडली होती. अखेर अल्पमतात आलेल्या उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर शिंदे गटाने भाजपसोबत युती करून सत्ता स्थापन केली. एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रिपदी, तर देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्रिपदी शपथ घेतली.

दरम्यान, आमदारांनतर शिवसेनेचे खासदारही बंडखोरी करण्याच्या मार्गावर असल्याच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांनी बोलावलेली बैठक महत्त्वाची मानली जात होती, मात्र या बैठकीला सात खासदारांनी दांडी मारल्याने शिवसेनेत पुन्हा फूट पडण्याची चिन्हे आहेत.

### द्रौपदी मुर्मू यांना पाठिंबा देण्याची मागणी

शिवसेनेच्या आमदारांपाठोपाठ खासदारदेखील मागील अनेक दिवसांपासून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संपर्कात आहेत. त्यातच राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत भाजपच्या उमेदवार द्रौपदी मुर्मू यांना पाठिंबा देण्याकडे शिवसेनेच्या खासदारांचा कल आहे. शिवसेना खासदार राहुल शेवाळे यांनी तर पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंना पत्र लिहून मुर्मू यांना राष्ट्रपतिपदासाठी पाठिंबा देण्याची मागणी केली होती.

### संजय राऊत वि. अन्य खासदार

या बैठकीत राज्यसभेचे खासदार संजय राऊत यांनी संयुक्त पुरोगामी आघाडीचे (यूपीए) उमेदवार यशवंत सिन्हांना पाठिंबा देण्याची ठाम भूमिका मांडली. त्यामुळे संजय राऊत विरूद्ध इतर खासदार असा सामना रंगला. या बैठकीनंतर नाराज झालेले राऊत माध्यमांशी न बोलता सामना कार्यालयाकडे निघून गेले.

### चिन्ह वाचवण्यासाठी शिवसेनेची धडपड

**मुंबई :** एकनाथ शिंदे यांच्या बंडखोरीनंतर शिवसेनेत दोन गट पडले आहेत. अनेक नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना समर्थन देत आहेत, तर उरलेले हे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासोबत आहेत. दरम्यान, शिवसेनेचे धनुष्यबाण हे चिन्हदेखील जाऊ शकते. त्यामुळे शिवसेनेने केंद्रीय निवडणूक आयोगाकडे धाव घेत कॅव्हेट दाखल केले आहे. यामध्ये त्यांनी आमची बाजू ऐकून घेतल्याशिवाय धनुष्यबाण या निवडणूक चिन्हावर कोणताही निर्णय घेऊ नये, अशी विनंती आयोगाला केली आहे.

# अंबरनाथमध्येही शिवसेनेला धक्का

## २२ नगरसेवक मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंसोबत



**अंबरनाथ : प्रतिनिधी**

ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवलीनंतर आता अंबरनाथ नगर परिषदेतही शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना धक्का बसला आहे. अंबरनाथ पालिका क्षेत्रातील २० लोकनियुक्त नगरसेवक आणि दोन स्वीकृत नगरसेवकांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना आपला पाठिंबा दर्शविला आहे.

अंबरनाथमधील २२ नगरसेवक, अनेक पदाधिकारी आणि शिवसैनिकांनी शिंदे गटाला समर्थन दिले आहे. या सर्वांनी कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांची भेट घेत आपण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत असल्याचे सांगितले. या वेळी अंबरनाथचे आमदार बालाजी किणीकर हेही उपस्थित होते.

शिवसेनेतून शिंदे गटात सहभागी होणाऱ्यांची संख्या दररोज वाढत आहे. एकीकडे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पाठिंबा वाढत असून दुसरीकडे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना एकामागोमाग एक धक्के बसत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

# शिंदे समर्थक आमदारांना तूर्त दिलासा

## विधानसभा अध्यक्षांनी कोणताही निर्णय घेऊ नये -सुप्रीम कोर्ट

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

शिवसेनेतून बंड केलेल्या १६ आमदारांना तात्पुरता दिलासा मिळाला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाशिवाय या आमदारांवर कोणतीही कारवाई करू नये, असे निर्देश सरन्यायाधीश एन. व्ही. रमणा यांनी सोमवारी (दि. ११) महाराष्ट्र विधानसभा अध्यक्षांना दिले. सरन्यायाधीशांच्या या निर्णयामुळे शिंदे समर्थक आमदारांना दिलासा मिळाला आहे.

विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांनी शिंदे गटातील १६ आमदारांना दिलेल्या अपात्रतेच्या नोटिसीविरोधात शिंदे गटाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. या प्रकरणाशी निगडित एकूण सात प्रकरणांवर सर्वोच्च न्यायालयात सोमवारी सुनावणी होणार होती, मात्र सुनावणीसाठी घटनापीठाची स्थापना करणे गरजेचे आहे, असे सरन्यायाधीश एन. व्ही. रमणा यांनी सांगितले तसेच जोपर्यंत या प्रकरणांची सुनावणी पूर्ण होणार नाही तोपर्यंत आमदारांवर कोणतीही कारवाई करू नये, असे सूचित केले.

शिवसेनेची बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी सर्वोच्च न्यायालयासमोर आज ठरलेल्या तारखेला म्हणजेच ११ जुलै रोजी प्रकरण सुनावणीसाठी घ्यावे, अशी विनंती केली होती, मात्र ही मागणीदेखील सर्वोच्च न्यायालयाने नाकारली आहे. पुढील सुनावणी नेमकी कधी होणार याबाबत न्यायालयाने स्पष्टपणे सांगितलेले नाही.

### सुनावणीसाठी घटनापीठाची स्थापना करण्यात येणार



शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी पक्षात केलेल्या बंडामुळे राज्यात मोठी राजकीय घडामोड घडली. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील महाविकास आघाडी सरकार पायउतार झाले, मात्र त्याआधी शिवसेनेने बंडखोर आमदारांवर कारवाईचा बडगा उगारणे सुरू केले होते. शिवसेनेने एकनाथ शिंदे यांची गटनेतेपदावरून हकालपट्टी करीत अजय चौधरी यांची गटनेतेपदी निवड केली. त्याला आव्हान देत शिंदे गटाने शिवसेनेच्या कारवाईच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यानंतर शिवसेनेच्या वतीनेही याचिका दाखल करण्यात आल्या होत्या, मात्र या प्रक्रियेला आता वेळ लागणार असल्याचे न्यायालयाच्या निर्देशानंतर स्पष्ट झाले आहे.



**गडचिरोली : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी आरमोरी तालुक्यात वैनगंगा नदीच्या पुलावरून पूरस्थितीची पाहणी केली. या वेळी त्यांनी जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांकडून पाणीपातळी आणि उपाययोजनांसंदर्भात माहिती घेतली.**

### निवडक

#### गुजरातमध्ये पुरामुळे हाहाकार; अनेक भागांमध्ये पाणी शिरले

**अहमदाबाद :** गुजरातमध्ये मुसळधार पाऊस आणि अनेक जिल्ह्यांमध्ये आलेल्या पुरामुळे परिस्थिती बिघडली आहे. एनडीआरएफची टीम घटनास्थळी कार्यरत आहे. गुजरातमध्ये पावसाळ्यात आतापर्यंत ६१ जणांचा मृत्यू झाला आहे, तर अतिवृष्टीमुळे २७२ जनावरे दगावल्याची माहितीही समोर येत आहे.

#### 'आयएनएस विक्रांत'ची शेवटची चाचणी यशस्वी

**कोची :** नौदलाच्या सामर्थ्यात भर घालणारी आयएनएस विक्रांत ही स्वदेशी बनावटीची विमानवाहू युद्धनौका नौदलात दाखल होण्यासाठी सज्ज झाली आहे. 'आयएनएस विक्रांत'ची चौथी आणि अखेरची चाचणी रविवारी (दि. १०) यशस्वी झाली. चाचणीनंतर ही युद्धनौका कोची बंदरातील शिपयार्डच्या तळावर परतली. जुलैच्या अखेरीस विक्रांत युद्धनौका नौदलाकडे सुपूर्द केली जाणार असून येत्या १५ ऑगस्टला नौदलाच्या सेवेत दाखल होणार आहे.

# नगरपालिकांच्या निवडणुका पुढे ढकला

## भाजप शिष्टमंडळाची निवडणूक आयोगाकडे मागणी



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात सध्या ठिकठिकाणी अतिवृष्टी होत असून नदी-नाल्यांना पूर आल्यामुळे स्थानिकांचा संपर्क तुटला आहे. अशा स्थितीत राज्य निवडणूक आयोगाने ९२ नगर परिषदा, चार नगरपंचायती व १५ ग्रामपंचायतींमधील निवडणूक कार्यक्रम पुढे ढकलावा, अशी मागणी भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्या नेतृत्वाखाली पक्षाच्या शिष्टमंडळाने सोमवारी (दि. ११) मुंबईत राज्य निवडणूक आयुक्त यू. पी. एस. मदान यांच्याकडे केली.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ओबीसी राजकीय आरक्षणाशिवाय होऊ नयेत, अशी भाजपची भूमिका असून निवडणुका पुढे ढकलल्यास हे आरक्षण पुन्हा लागू करण्यास सवड मिळेल, असे मत भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी आयोगाच्या कार्यालयाबाहेर पत्रकारांना सांगितले.

प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्या समवेत माजी मंत्री गिरीश महाजन, प्रदेश उपाध्यक्ष राम शिंदे, जयकुमार रावल, सुनील कर्जतकर, सरचिटणीस चंद्रशेखर बावनकुळे व माजी मंत्री सदाभाऊ खोत उपस्थित होते. याचबरोबर राज्यातील विविध नगरपालिकांच्या क्षेत्रातील स्थानिक भाजप आमदार आणि स्थानिक नेते राज्य निवडणूक आयुक्तांसोबतच्या बैठकीस उपस्थित होते.

प्रदेशाध्यक्ष पाटील पुढे म्हणाले की, राज्य निवडणूक आयोगाने दोन दिवसांपूर्वी अचानक ९२ नगरपालिका, चार नगरपंचायतींच्या निवडणुका जाहीर केल्या. **(पान २ वर..)**

### अनिल देशमुखांचा जामीन अर्ज सीबीआय कोर्टाने फेटाळला

**मुंबई : प्रतिनिधी**

भ्रष्टाचारप्रकरणी तुरुंगात असलेले महाराष्ट्राचे माजी गृहमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अनिल देशमुख यांना पुन्हा एकदा मोठा झटका बसला आहे. विशेष सीबीआय न्यायालयाने देशमुख यांचा जामीन अर्ज फेटाळला असून त्यांचे सहकारी कुंदन शिंदे आणि संजीव पालांडे यांचे जामीन अर्जही न्यायालयाने फेटाळले आहेत.

सीबीआयने ६० दिवसांच्या अनिवार्य कालावधीत आरोपपत्र दाखल केले नाही आणि नंतर अपूर्ण आरोपपत्र दाखल केले असे म्हणत अनिल देशमुख व सहकारी अशा तिघांनी न्यायालयाकडे जामीन मागितला होता, मात्र न्यायालयाने तो फेटाळत सीबीआयने विहित मुदतीत आरोपपत्र दाखल केल्याचे म्हटले आहे.

### संसद इमारतीवरील अशोक स्तंभाचे पंतप्रधान मोदींच्या हस्ते अनावरण

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

संसदेच्या नवीन इमारतीवर बांधण्यात आलेल्या अशोक स्तंभाचे अनावरण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सोमवारी (दि. ११) करण्यात आले. या वेळी पंतप्रधानांनी या वास्तूचे बांधकाम करणाऱ्या कामगारांशी संवाद साधला.

सेंट्रल विस्टा प्रकल्पांतर्गत संसदेची नवीन इमारत उभारली जात आहेत. सोबतच इंडिया गेटजवळ १० अजून इमारती बांधल्या जाणार आहेत, ज्यामध्ये ५१ मंत्रालयाची कार्यालये असणार आहेत. नवीन संसद बनवण्याचे काम टाटा प्रोजेक्ट्स लिमिटेडला देण्यात आले आहे.

संसदेच्या नवीन इमारतीवर बांधण्यात आलेल्या अशोक स्तंभाची उंची ६.५ मीटर असून तो कांस्यपासून बनवला गेला आहे तसेच या स्तंभाचे वजन नऊ हजार ५०० किलो आहे.



अशोक स्तंभाचे अनावरण करताना पंतप्रधान मोदी यांच्यासोबत लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, राज्यसभेचे उपसभापती हरिवंश नारायण सिंह, केंद्रीय मंत्री हरदीप सिंग पुरी उपस्थित होते.

# पनवेलच्या वारकरी दिंडीला श्री विठ्ठल निर्मल दिंडी पुरस्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील संत तुकाराम महाराज पायी कोकण दिंडीला प्रथम क्रमांकाचा श्री विठ्ठल निर्मल दिंडी पुरस्कार देऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते रविवारी (दि. १०) पंढरपूर येथे सन्मानित करण्यात आले. एक लाख रुपये आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पंढरपूरमध्ये सन्मान



पंढरीची वारी ही महाराष्ट्राची प्राचीन, आध्यात्मिक व सांस्कृतिक परंपरा आहे. वारीत सहभागी होणाऱ्या अनेक दिंड्या सामाजिक प्रबोधनाचे कार्य करीत असतात. या दिंड्यांचा आदर्श घेऊन 'निर्मल वारी हरित वारी' अभियानामध्ये नागरिकांचा सहभाग वाढवावा या उद्देशाने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीमार्फत श्री विठ्ठल निर्मल दिंडी पुरस्कार देण्यात येतो.

पंढरपूर येथील विठ्ठल मंदिरात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. प्रथम क्रमांकाचे पारितोषिक श्री संत तुकाराम महाराज कोकण दिंडी-पनवेल, जि. रायगड (एक लाख रुपये व सन्मानचिन्ह), द्वितीय क्रमांक-वै. हभप भाऊसाहेब महाराज खरवळकर दिंडी-शेरा, ता. रेणापूर, जि. लातूर (७५ हजार व सन्मानचिन्ह) आणि तृतीय क्रमांकाचे पारितोषिक श्री संत जगनाडे महाराज दिंडी-घोटी बुद्रुक, जि. नाशिक (५० हजार व सन्मानचिन्ह) यांना प्रदान करण्यात आले.

# आमदार भरत गोगावले यांच्या कारला अपघात

**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे समर्थक महाडचे आमदार आणि शिवसेनेचे मुख्य प्रतोद भरत गोगावले यांच्या कारला सोमवारी (दि. ११) अपघात झाला. आमदार गोगावले यांचा ताफा इस्टर्न-एक्स्प्रेस वेवरून निघालेला असताना आठ गाड्या एकमेकांवर आदळल्या. सुदैवाने या अपघातात कोणीही जखमी झालेले नाही.



### सर्वजण सुरक्षित

स्वतः आमदार भरत गोगावले यांनी व्हिडीओच्या माध्यमातून अपघाताबद्दल माहिती दिली. त्यांनी सांगितले की, टॅक्सी बिघडल्यामुळे हा अपघात झाला. एक टॅक्सी रस्त्यात उभी राहिली असता मागून जाणाऱ्या आठ गाड्या एकमेकांवर आदळल्या. आमची गाडी पाचवी होती. आमच्या पुढे पोलिसांची गाडी होती. पोलिसांच्या गाडीवर आमची गाडी आदळली आणि नुकसान झाले, पण कोणालाही काही दुखापत झालेली नाही. आम्ही सर्वजण सुरक्षित आहोत.

# सीकेटी महाविद्यालयात उद्या गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**





जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर (सीकेटी) कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात (स्वायत्त) प्रथम, द्वितीय, तृतीय वर्ष पदवी व पदव्युत्तर वर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा बुधवारी (दि. १३) सकाळी ११.३० वाजता संस्थेचे स्फूर्तिस्थान स्व. चांगू काना ठाकूर यांच्या पुण्यस्मरण दिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आला आहे.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई विद्यापीठाचे वित्त आणि लेखाधिकारी सीए डॉ. प्रदीप कामठेकर, संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य आमदार प्रशांत ठाकूर, महापौर डॉ. कविता चौतमोल उपस्थित राहणार आहेत.

याचबरोबर संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, उपमहापौर सीताताई पाटील, संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य व मनपा सभागृह नेते परेश ठाकूर, संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य व नगरसेवक अनिल भगत, संजय भगत, नगरसेवक मनोहर म्हात्रे, एकनाथ गायकवाड, नगरसेविका हेमलता म्हात्रे, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती या सोहळ्याला लाभणार आहे.

या सोहळ्यात सर्व पालक व विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील यांनी केले आहे. सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी स्टुडंट कौन्सिल व स्टुडंट वेलफेअर विभागाच्या चेअरमन डॉ. एम. ए. म्हात्रे, आयक्यूएसी विभागाचे समन्वयक डॉ. बी. डी. आघाव व महिला विकास कक्षाच्या चेअरमन डॉ. आर. डी. म्हात्रे यांचा विशेष सहभाग लाभत आहे.

# आदित्य ठाकरेंवर गुन्हा दाखल करा

## ■ राष्ट्रीय बाल हक्क आयोगाची मुंबई पोलिसांना नोटीस

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांचे सरकार स्थापन झाल्यानंतर, कांजूरमार्ग येथे होणारे मेट्रो कारशेड पुन्हा आरेमध्ये उभारण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. यामुळे पर्यावरणप्रेमी मंडळींनी रविवारी (दि. १०) आरे वाचवा आंदोलन केले. या आंदोलनात आदित्य ठाकरे यांच्यासह अनेक अल्पवयीन मुलांनी सहभाग घेतला होता. याच मुद्यावरून आता राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगाने मुंबई पोलिसांना नोटीस बजावली आहे. तीन दिवसांत योग्य ती कारवाई



करून आदित्य ठाकरे यांच्यावर गुन्हा दाखल करण्याचे आदेश आयोगाने दिले आहेत. यामुळे आदित्य ठाकरे यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे.

राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगाने मुंबई पोलिसांना जारी केलेल्या नोटिसीमध्ये म्हटले की, मुंबई जिल्हा फुटबॉल संघटनेचे अध्यक्ष आदित्य ठाकरे यांनी शिवसेनेची युवा शाखा असलेल्या युवासेनेमधील अल्पवयीन मुलांचा वापर आरे वाचवा आंदोलनासाठी केला आहे. याबाबतच्या काही

**या तक्रारीची दखल घेऊन आयोगाने सोमवारी मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसळकर यांना पत्र पाठवून आदित्य ठाकरे आणि इतर संबंधितांविरोधात तत्काळ कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. प्रकरणाची चौकशी करून गुन्हे दाखल करावेत. संबंधित मुलांना बालकल्याण समितीसमोर हजर करून त्यांचेही जबाब नोंदवावेत. या सर्व कार्यवाहीचा अहवाल एफआयआरच्या प्रतीसह पुढील तीन दिवसांत सादर करावा, असेही आदेश आयोगाने दिले आहेत. त्यामुळे आता आदित्य ठाकरे यांच्या अडचणी वाढ होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.**

तक्रारी प्राप्त झाल्या आहे. संबंधितांनी हातात पोस्टर घेऊन आंदोलन करणाऱ्या अल्पवयीन मुलांचे फोटोदेखील शेअर केले आहेत. त्यामुळे संबंधित आरोपीविरोधात तत्काळ एफआयआर दाखल करून चौकशी करण्याची विनंती, आयोगाकडून केली जात आहे. हे पत्र मिळाल्यानंतर तीन दिवसांत कारवाई करून संबंधित अहवाल आयोगाकडे पाठवावा, असेही संबंधित नोटिसीमध्ये म्हटले आहे.

# उद्धव ठाकरे दृष्टिकोन बदला -आमदार संतोष बांगर

**हिंगोली : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे समर्थक आमदार संतोष बांगर यांची शिवसेनेच्या हिंगोली जिल्हा प्रमुखपदावरून हाकालपट्टी करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर



भडकलेल्या आमदार बांगर यांनी शक्तीप्रदर्शनाचा निर्णय घेतला असून थेट उद्धव ठाकरे यांना आव्हान दिले आहे. त्याचप्रमाणे दिशाभूल करणाऱ्यांना बाजूला करा आणि गोष्टींकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदला, असा सल्लाही आमदार बांगर यांनी ठाकरेंना दिला आहे.

आमदार बांगर म्हणाले, मी बाळासाहेबांचा कडवट शिवसैनिक आहे. सरसेनापती बाळासाहेब ठाकरे हयात असताना माझी शिवसेना जिल्हा प्रमुखपदी नियुक्ती झाली होती. माझी कुठलीही चूक नाही, पण मला पदावरून हटविण्यात आले आहे, मात्र मी पदावरून दूर झालेलो नाही. मी आजही शिवसेनाचा जिल्हाप्रमुख आहे आणि उद्याही राहिन.

### १२ खासदार, ५०च्यावर जिल्हाप्रमुख संपर्कात

लहान तोंडी मोठा घास घेणे चुकीचे आहे, पण आपले ४० आमदार शिंदे गटाकडे शिवसेनेचा मुख्यमंत्री व्हावा यासाठी गेले आहेत. काँग्रेस-राष्ट्रवादीसोबतची युती अभद्र होती. आम्ही शिवसेनेच्या मुख्यमंत्र्याला मतदान केले असून कुठलाही गुन्हा केलेला नाही. आज तुम्हाला सांगतो आणखी १२ खासदार आणि ५०च्यावर जिल्हाप्रमुखांनी आम्ही शंभर टक्के तुमच्यासोबत आहोत, असे आम्हाला सांगितलेय. बाकीच्या शिवसैनिकांनाही जी भाजप-शिवसेनेची नैसर्गिक युती होती तीच मान्य होती, असेही आमदार बांगर यांनी म्हटले आहे.

## 'रोटरी'तर्फे वृक्षदिंडीसह वृक्षारोपण उपक्रम

**पनवेल : वार्ताहर**

निसर्गाला तसेच पर्यावरणालाच विठ्ठल मानून रोटरीतर्फे वृक्षदिंडी आणि वृक्षारोपण उपक्रम उत्साहात झाला. रोटरीयन्स, ऍनस, अनेटस असे जवळपास ५० जणांनी कर्नाळा अभयारण्यात जाऊन वृक्षदिंडी काढली.

वृक्षारोपणासाठीच्या पोषक पावसाळी वातावरणाचा आनंद घेत तेथील वनचर प्राणी, पक्षांसाठी आवश्यक अशा ५० विविध फळझाडांचे आणि तिथल्या वातावरणासाठी आवश्यक असलेल्या रोपांचे वृक्षारोपण केले. कर्नाळा अभयारण्यातील वन अधिकाऱ्यांची गरज आणि विनंती लक्षात घेऊन, रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल आणि भारत गॅस सर्व्हिस यांच्या वतीने सहा मोठ्या आकाराचे सूचनाफलक मोक्याच्या जागी लावण्यासाठी क्लबचे माजी प्रांतपाल डॉ. गिरीश गुणे आणि रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१चे सेक्रेटरी डॉ. आमोद दिवेकर, अध्यक्ष लक्ष्मण पाटील, माजी अध्यक्ष शिरीष वारंगे, संतोष घोडींदे, डॉ. अभय गुरसाळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

## राज्यातील दैनंदिन लसीकरणात घट

### कोरोना संसर्ग कमी झाल्याने नागरिकांचा प्रतिसाद कमी

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील दैनंदिन कोरोना रुग्णसंख्येचा आलेख कमी होत असतानाच दैनंदिन लसीकरणामध्येही घट होत असल्याचे दिसते. सध्या दैनंदिन लसीकरण सुमारे ७० हजारांवर आले आहे. जूनमध्ये हे प्रमाण एक लाखांपेक्षा अधिक होते.



जूनमध्ये रोज सुमारे एक लाखांपेक्षा अधिक नागरिकांचे लसीकरण करण्यात येत होते. तिसरी लाट ओसरल्यानंतर लसीकरणाचे प्रमाणही कमी झाले आहे. मे महिन्यापर्यंत या प्रमाणात घट होऊन दैनंदिन सरासरी लसीकरण सुमारे ६० हजारांपर्यंत कमी झाले होते. मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात कोरोनाबाधितांची संख्या पुन्हा वेगाने वाढायला लागली. परिणामी जूनच्या पहिल्या आठवड्यातच लसीकरणासाठीचा प्रतिसाद वाढला. जूनमध्ये दैनंदिन लसीकरणाचे प्रमाण जवळपास पुन्हा एक लाखांवर गेले होते.

जूनच्या शेवटच्या आठवड्यापासून कोरोनाबाधितांची संख्या तीन हजारांपेक्षा कमी होण्यास सुरुवात झाली. त्यानंतर या महिन्याच्या सुरुवातीपासूनच लसीकरणही कमी झाले. गेल्या दहा दिवसांत राज्यात रोज सुमारे ७० हजार नागरिकांचे लसीकरण करण्यात येत आहे. त्यामुळे मे महिन्याप्रमाणे पुन्हा लसीकरणाची गती मंदावली आहे.

## मृत व्यक्तीच्या नातेवाईकांचा पोलिसांकडून शोध

**पनवेल : वार्ताहर**

फिट येऊन मृत झालेल्या व्यक्तीच्या नातेवाईकांचा पोलीस शोध घेत असून त्याबद्दल माहिती असल्यास पनवेल शहर पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

नौशाद अहमद (वय ३१, रा. उरण नाका) हा शिवा कॉम्प्लेक्स या ठिकाणी बेशुद्ध स्थितीमध्ये खांदेश्वर पोलिसांना आढळून आला. त्याला तत्काळ उपचाराकरिता उपजिल्हा रुग्णालयात ठिकाणी दाखल केले असता, डॉक्टरांनी नौशाद अहमद याला मुंबईतील जे. जे. रुग्णालय या ठिकाणी घेऊन जाण्याचा सल्ला दिल्याने त्याला पुढील उपचारासाठी जे. जे. रुग्णालय या ठिकाणी दाखल केले, मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्य झाला.

पनवेल शहर पोलीस नौशाद अहमद यांच्या नातेवाईकांचा शोध घेत असून जर कोणी त्याचे नातेवाईक असतील, तर त्यांनी पनवेल शहर पोलीस उपनिरीक्षक सुनील गिरी (मोबाइल क्र. ९८९०७७७७६२) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## सीआयएसएफच्या जवानाला दीड लाखांचा ऑनलाइन गंडा

**पनवेल : वार्ताहर**

ऑनलाईन आधार कार्ड अपडेट करण्याच्या प्रयत्नात असलेल्या सीआयएसएफच्या जवानाला एका सायबर चोरट्याने त्यांच्या खात्यातून दीड लाख रुपयांची रक्कम काढून घेत फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. खारघर पोलिसांनी या प्रकरणी सायबर गुन्हा दाखल केला आहे.

फसवणूक झालेला सीआयएसएफचा जवान खारघरमध्ये कुटुंबासह राहण्यास असून सध्या तो मुंबई विमानतळावर कार्यरत आहे. या जवानाला सीआयएसएफ फोर्सकडून मिळालेले आयुष्मान कार्ड हे आधार कार्डसोबत लिंक करायचे होते. या जवानाने एका वेबसाईटवरील मोबाईलवर संपर्क साधला असता तो लागला नाही, मात्र दुसऱ्या दिवशी त्याच नंबरवरून सायबर चोरट्याने संपर्क साधून त्याला आधार कार्ड अपडेट करण्यासाठी एसएमएस पाठवित असल्याचा बहाणा केला. जवानाने लिंक उघडून त्यात आपली माहिती भरल्यानंतर अपडेटचे २५ रुपये चार्जेस भरण्याचा प्रयत्न केला, मात्र जवानाला बँकेकडून ओटीपी न आल्याने त्याने सायबर चोरट्याने संपर्क साधल्यानंतर त्याने या जवानाला आपल्या मोबाईलवर क्विक सपोर्ट हे ॲप डाऊनलोड करण्यास सांगितले. जवानाने ॲप डाऊनलोड केल्यानंतर काही वेळातच त्याच्या खात्यातून १४ व्यवहारांद्वारे तब्बल एक लाख ५० हजार काढण्यात आल्याचे मेसेजेस जवानाच्या मोबाईलवर आला.

# सीकेटी महाविद्यालयात राष्ट्रीय विद्यार्थी दिन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय विद्यार्थी दिनाचे औचित्य साधून जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेल येथील चांगु काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (स्वायत्त)च्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने स्पर्धा परीक्षेतील संधी व व्यक्तिमत्व विकास या विषयावर अतिथी व्याखानाचे शनिवारी (दि. ९) महाविद्यालयाच्या चर्चासत्र सभागृहात आयोजन करण्यात आले. या वेळी रायगड जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचा प्रारंभ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांच्या संबोधनाने झाला. या वेळी त्यांनी विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्व विकासाचे महत्त्व सांगून सर्वांगिण विकास करण्याबाबत भाष्य केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक





मांडताना राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. सुर्यकांत परकाळे यांनी विद्यार्थी केंद्रित उपक्रमांच्या आयोजनाबाबत महविद्यालयाचे प्राचार्य आणि व्यवस्थापनाच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रमाचे मुख्य अतिथी मनोज सानप यांनी विद्यार्थ्यांशी हितगुज साधताना व्यक्तिमत्व विकास म्हणजे फक्त स्वतःचा विकास नव्हे तर समाजाप्रती आपले जे उत्तरदायित्व आहे, त्याची परिपूर्ती करणे हे महत्त्वाचे आहे, असे मार्गदर्शन केले. स्पर्धा परीक्षेत यशाकरिता व्यक्तिमत्त्व विकास महत्त्वाचा आहे आणि त्यात आपण कोणत्या प्रकारे सुधारणा करू शकतो त्याचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रातिनिधिक स्वरूपात दोन विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. आकाश पाटील यांनी केले व आभार प्रदर्शन प्रिया चौधरी या स्वयंसेविकेने केले. या वेळी एबीव्हीपीचे अमित ढोमसे, वैष्णव देशमुख, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी, प्राध्यापक, विद्यार्थी तथा स्वयंसेवक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. सुर्यकांत परकाळे, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. अपूर्वा ढगे, कार्यक्रम अधिकारी प्रा. आकाश पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे आयोजित केलेल्या नावीन्यपूर्ण उपक्रमाबद्दल आयोजनाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कौतुक केले.

## पनवेलमध्ये संत गोरा कुंभार यांची जयंती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कुंभार-प्रजापती समाजाचे आराध्य दैवी संत शिरोमणी संत गोरा कुंभार (गोरोबा काका) यांची जयंती व आषाढी एकादशीचे आयोजन संत गोरा कुंभार प्रतिष्ठानतर्फे पनवेलमध्ये करण्यात आले होते. यामध्ये समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

गोरोबा काकांची जयंती व आषाढी एकादशी समाज बांधवांनी मोठ्या श्रद्धेने व उत्साहात साजरी केली. या वेळी भजन कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. यासोबतच प्रसाद व फराळाचीही व्यवस्था करण्यात आली होती. प्रजापती समाज विकास मंडळाचे संस्थापक अध्यक्ष सी. पी. प्रजापती, संस्थेचे



सचिव विनोदकुमार प्रजापती व महिला सेल अध्यक्ष पूनम प्रजापती आदींनी भेट देऊन पुष्प अर्पण केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नरेंद्र पनवेलकर, दैवत पनवेलकर, हरेश जामसुतकर, सुरेश कल्याणकर, दत्तात्रेय पनवेलकर, दिलीप पनवेलकर, रितेश पनवेलकर, तक्षक पनवेलकर, विमल वाजेकर, नयना पनवेलकर, डॉ. नमिता पनवेलकर, नम्रता पनवेलकर, हर्षदा जामसुतकर आदींनी आपले अनमोल योगदान दिले.

पान १ वरून

### नगरपालिकांच्या निवडणुका पुढे ढकला

त्यानुसार २० जुलै ते १८ ऑगस्ट या कालावधी निवडणूक कार्यक्रम असेल. हा सर्व पावसाचा कालावधी आहे. सध्या राज्यात अतिवृष्टीमुळे ठिकठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे राजकीय पक्षांना निवडणूक अर्ज दाखल करणे, प्रचार करणे आणि मतदारांनी मतदान करणे अवघड होणार आहे. त्यामुळे आयोगाने हा निवडणूक कार्यक्रम पुढे ढकलावा, अशी विनंती आम्ही केली. राज्य निवडणूक आयुक्तांनी याबाबत शहरानुसार फेरआढावा घेण्याचे आश्वासन दिले.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर करताना पावसाचा अंदाज घ्यावा, असे सर्वोच्च न्यायालयाने निकालात म्हटले आहे. आयोगाने पावसाच्या आकडेवारीचा विचार केला असला तरी वस्तुस्थितीचा विचार करावा, असे आमचे म्हणणे आहे. २०१९ व २०२१ अशी दोन वर्षे कराड शहराचा बहुतांश भाग काही आठवडे पाण्याखाली होता, तर गेल्या वर्षी कागल शहराचा पंधरा दिवस पावसामुळे परिसराशी संपर्क तुटला होता. ही दोन उदाहरणे ध्यानात घेतली, तर पावसाच्या बाबतीत वस्तुस्थिती लक्षात येईल, याकडे प्रदेशाध्यक्ष पाटील यांनी लक्ष वेधले आहे.

# पावसाळी पर्यटनासाठी नाणेघाटात गर्दी

**पुणे : प्रतिनिधी**

खोल दरीतून वर येणारे दाट धुके, झोंबणारा गार वारा व कोसळणाऱ्या पावसाच्या सरी झेलत नाणेघाटात शनिवारी व रविवारी सुट्टीच्या दोन दिवसांत सुमारे चार हजार पर्यटकांनी पावसाळी पर्यटनाचा मनमुराद आनंद लुटला.

घाटघर येथील उपद्रव शुल्क नाक्यावर दोन दिवसांत बाहेरगावहून आलेल्या ७३३ दुचाकी व चारचाकी वाहनांची नोंद झाली असून या वाहनातून तीन हजार ४७८ पर्यटक आल्याचे सांगण्यात आले. गेल्या आठवड्यापासून नाणेघाट परिसरात होत असलेल्या पावसाने पर्यटकांची पावले येथे वळू लागली आहेत.

ब्रिटीश कालीन फडके बंधारा उंची वाढविल्यानंतर प्रथमच तुडुंब भरून वाहत आहे. बंधाऱ्याच्या खाली केलेल्या पायऱ्या वरून फेसाळत वाहणाऱ्या पांढऱ्या शुभ्र पाण्यात बसण्याचा आनंद पर्यटक घेत आहेत.

परिसरातील ओढे नाले भरून वाहू लागले आहेत. भातखाचरे पाण्याने भरली आहेत. अशा निसर्गरम्य वातावरणात फिरण्यासाठी पुणे, मुंबई, ठाणे येथून सुट्टीच्या दिवशी येणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढत आहे.

पर्यटनावरील निर्बंध दूर झाल्याने वनविभागाच्या वतीने घाटघर येथील संयुक्त वनव्यवस्थापन समितीने येथे उपद्रव शुल्क आकारणी सुरू केली असून सुरक्षा रक्षकांची नेमणूक केली आहे. येथील परिसरात मद्यपानाला बंदी घालण्यात आली आहे. हुल्लडबाज पर्यटकांकडून अन्य पर्यटकांना त्रास होणार नाही याची दक्षता सुरक्षा रक्षक घेत असल्याचे वनक्षेत्रपाल अजित शिंदे यांनी सांगितले.







पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
मंगळवार, दि. १२ जुलै २०२२ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)
कोविशिल्ड कोव्हॅक्सिन कार्बेव्हॅक्स
सर्व केंद्रांवर (वयोगट : १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ६. टाटा अॅडव्हान्स सेंटर, खारघर
- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- ८. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल

Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.

## भाजपच्या पाठपुराव्याला यश

# मुंबई ते खारघरदरम्यान बससेवा सुरू



**खारघर : रामप्रहर वृत्त**

बेस्ट प्रशासनाकडून मुंबई विमानतळ ते खारघरदरम्यान सोमवारपासून (दि.११) बस सेवा सुरू झाली आहे. ही सेवा सुरू व्हावी, यासाठी अनेक प्रवाशांनी मागणी केली होती. थेट विमानतळापर्यंत बेस्टची सेवा सुरू झाल्याने प्रवाशांचा वेळ आणि पैशाची बचत होणार आहे.

बेस्ट प्रशासनाकडून मुंबई विमानतळ ते वाशी डेपोदरम्यान वातानुकूलित बससेवा सुरू आहे. नवी मुंबईप्रमाणेच खारघरमधूनही देश-विदेशात नोकरी व व्यवसायानिमित्त बाहेर जाणाऱ्यांची संख्या मोठी आहे. मुंबई विमानतळावरून उबेर, ओला, टॅक्सी आदी खासगी वाहतूक सेवांकडून भरमसाठ दर आकारले जातात. त्यामुळे खारघरवासीयांना आर्थिक भूर्दंड सहन करावा लागत आहे.

वाशी ते मुंबई विमानतळदरम्यान धावणारी बेस्टची बस खारघरपर्यंत वाढविल्यास अधिक सोयीचे होईल, असे पत्र भाजपचे खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल यांनी महापौर डॉ. कविता चौतमोल आणि आयुक्त गणेश देशमुख यांना दिले होते. याची दखल घेत पनवेल पालिकेने बेस्ट प्रशासनाकडे बस सेवा सुरू करण्याबाबत विचारणा केली होती. दरम्यान, बेस्ट प्रशासनाची ही बस सेवा खारघर ते मुंबई विमानतळदरम्यान धावली असल्याने खारघरवासी समाधान व्यक्त करीत आहे.

**पनवेल महापालिकेकडून वाशी ते मुंबई विमानतळदरम्यान धावणारी बेस्ट बस खारघरपासून सुरू करावी या विषयी पत्र व्यवहार करण्यात आले होते. पत्राची दखल घेऊन खारघरपासून मुंबई विमानतळदरम्यान बस धावली ही समाधानाची बाब आहे.**
**-डॉ. कविता चौतमोल, महापौर, पनवेल महापालिका**

**खारघर ते विमानतळ बेस्ट सुरू झाल्यामुळे खारघरवासीयांसाठी समाधानाची बाब आहे. तसेच खारघर ते मंत्रालय बेस्ट सेवा सुरू करावी, अशी मागणी भाजपकडून करण्यात आली होती.**
**-ब्रिजेश पटेल, खारघर शहर भाजप अध्यक्ष**



**पनवेल : भाजप महिला मोर्चा उलवे नोड उपाध्यक्ष समृद्धी अडसुळे यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, वहाळचे उपसरपंच अमर म्हात्रे, महिला मोर्चा उलवे नोड अध्यक्ष निकीता खारकर, प्रणय कोळी, प्रवीण ठाकूर, हरी घरत, किरण जगताप, कृष्णा सदादेवन आदी उपस्थित होते. दरम्यान, अडसुळे यांनी वाढदिवसानिमित्त उलवे नोड येथील मुक्ताई वृद्धाश्रमात अन्नदान केले.**



**पनवेल : भाजप युवा कार्यकर्ता शुभम कांबळे याला वाढदिवसानिमित्त उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, भाजप युवा मोर्चा शहर कोषाध्यक्ष देवांशु प्रभाळे, सिद्धार्थ मोहिते, अखिलेश पाटील, वास्तव चव्हाण उपस्थित होते.**

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात लोगो बनवण्याच्या स्पर्धेस प्रतिसाद



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात व्यवस्थापन समितीच्या वतीने उत्कृष्ट लोगो (प्रतिक चिन्ह) बनवण्याची स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी विशेष प्रोत्साहन दिले, तसेच अंतर्गत गुणवत्ता सिदधता कक्षच्या समन्वयक प्रा. महेश्वरी झिरपे व इतर प्राध्यापक वृंद उपस्थित होते.

या स्पर्धेचे आयोजन व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रा. रीत थुळे यांनी केले. तसेच प्रा. रेवन शिदे, प्रा. अंकिता जांगीड, मीरा पटेल व भाग्यश्री शुक्ला यांनी सहकार्य केले. या स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील सुमारे ३४ स्पर्धकांनी यात सहभाग घेतला व आपल्या विविध रचना व सर्जनशीलतेचे प्रदर्शन करून विविध प्रतिक चिन्ह (लोगो) सादर केले.

संस्थेचे अध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या स्पर्धेचे आयोजन केल्याबद्दल आयोजकांचे कौतुक केले. तसेच संस्थेचे अध्यक्ष अरूणशेठ भगत, उपाध्यक्ष वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर व संस्थेचे सचिव डॉ. सिदेश्वर गडदे यांनी आयोजकांची प्रशंसा केली.

# पनवेल महापालिकेच्या शाळांमध्ये वह्यावाटप

## श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचा स्तुत्य उपक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या माध्यमातून दरवर्षी गरीव गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक उपक्रम राबवून त्यांना मदत करण्यात येते. त्यापार्श्वभूमीवर पनवेल महापालिकेच्या शाळा क्रमांक ५ मोठा खांदा येथे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सौजन्याने शाळेतील विद्यार्थ्यांना वह्यांचे मोफत वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला नगरसेवक मनोहर म्हात्रे, नगरसेविका हेमलता म्हात्रे, माजी नगरसेविका अलका भगत, भाजप नेते सतीश पाटील, परेश पाटील यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. या वेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून आयुष्यामध्ये शिक्षणाचे महत्त्व सांगितले.

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या तक्का येथील शाळा क्रमांक ७ या मराठी शाळेतील विद्यार्थ्यांना श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने सोमवारी (दि. ११) वह्यांचे मोफत वाटप करण्यात आले. या वेळी भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे आणि नगरसेवक अजय बहिरा यांच्या हस्ते या वह्यांचे वाटप विद्यार्थ्यांना करण्यात आले.

गेल्या ३० वर्षांपासून सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात नेहमची अग्रेसर असलेल्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने गरीब व गरजूंना शैक्षणिक साहित्यांचे वाटप करण्यात येत आहे. त्यानुसार पनवेल महापालिकेच्या तक्का येथील महापालिकेच्या मराठी शाळेत मंडळाच्या सौजन्याने वह्यांचे वाटप करण्याचा कार्यक्रम सोमवारी आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाला माजी नगरसेवक प्रभाकर बहिरा, वॉर्ड अध्यक्ष रघुनाथ बहिरा, युवा नेते प्रतिक बहिरा, मंगेश भगत, वैभव पाटील, मुख्याध्यापीका संध्या सावळे, रमेश पाटील, कांचन पाटील, जयश्री खेडेकर, संगिता गवारे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विद्यार्थी उपस्थित होते.



## नगरसेवक शत्रुघ्न काकडे यांच्या प्रसंगावधानाने अनर्थ टळला

**खारघर : रामप्रहर वृत्त**

बेलपाडा गावातील सेक्टर ३ मधील प्रभू सृष्टी सोसायटी प्लॉट नंबर ई/१०६च्या सहाव्या मजल्यावर अचानकपणे आग लागल्याचे समजताच अग्निशमन गाडी येण्याअगोदर नगरसेवक शत्रुघ्न अंबाजी काकडे यांनी व शिवप्रतिष्ठान मित्रमंडळाच्या सदस्यांनी मिळून ही आग आटोक्यात आणली. त्यामुळे जीवित व वित्तहानी वाचल्याने मोठा अनर्थ टळला.



आषाढी एकादशी व स्वतःचा वाढदिवस यामध्ये व्यस्त असूनसुद्धा प्रसंगावधान राखून तत्काळ मदत केल्यामुळे सर्व नागरिकांनी त्यांचे आभार व्यक्त केले. या वेळी सरचिटणीस दीपक शिंदे, सोमनाथ म्हात्रे, विजय भोसले, रवींद्र काकडे, विजय उजळंबे, रूपेश काकडे, प्रतीक चव्हाण, आकाश काकडे, निखिल जाधव, योगेश मोरबेकर, विवेकानंद गर्जे, रोशन मोरबेकर, राकेश मोरबेकर, बंटी म्हात्रे, योगेश अमृतसागर यांनी विशेष सहकार्य केले.

## नवीन पनवेलमध्ये आषाढी एकादशीनिमित्त दिंडी सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आषाढी एकादशीनिमित्त पनवेल महापालिकेच्या नगरसेविका चारुशीला घरत यांच्या माध्यमातून नवीन पनवेलमध्ये दिंडी सोहळा आयोजित करण्यात आला होता. यंदाचे हे या सोहळ्याचे आठवे वर्ष असून नवीन पनवेल सेक्टर १५ येथील सावतामाळी मंदिरापासून या पालखीला सुरुवात झाली व संपूर्ण पोदी परिसरातील विठ्ठल नामाचा गजर करत दिंडी फिरवण्यात आली.



या दिंडीचे खास आकर्षण विठ्ठल-रखुमाईचे पात्र होते. सर्वांनाच पंढरपूरपर्यंत पायी वारी जमत नाही. वारीचा आनंद त्यामुळे सर्वांना घेता यावा या दृष्टिकोनातून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या दिंडीसाठी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या.

या दिंडीत भाजपचे जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, नगरसेवक अजय बहिरा, युवा नेते प्रतिक बहिरा, किशोर मोरे, शैलेश पाटील, हेमंत पाटील, अनिल लोंढे, महेंद्र ठाकूर, अमोल वाघमारे, संतोष साळवे, सरोज मोरे, सरिता पाटील, निलाक्षी थळी, शिवाजी रावते, अॅड. प्रमिला ढोले, प्रभा सिन्हा, विशाखा घोलपकर यांच्यासह मुक्ताई भजन मंडळ, नाच ग घुमा गृप, उत्कर्ष मंडळ, जी. एस. फाऊंडेशन, सावतामाळी मंदिराचे सदस्य आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## पनवेल मनपाच्या प्रशासकपदी आयुक्त गणेश देशमुख

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिकेच्या विद्यमान सदस्यांची मुदत ८ जुलै रोजी संपल्याने आयुक्त गणेश देशमुख यांची प्रशासक म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. त्यामुळे यापुढे निवडणुका होईपर्यंत महापालिकेतील विकास कामे प्रशासकच्या माध्यमातून होणार आहेत.

पनवेल महापालिकेची स्थापना १ ऑक्टोबर २०१६ रोजी झाली. महापालिकेची पहिली सार्वत्रिक निवडणूक २ मे २०१७ रोजी झाली होती. निवडून आलेल्या नगरसेवकांचा पाच वर्षांचा कार्यकाळ ८ जुलै २०२२ रोजी संपला आहे. पावसाळा असल्याने निवडणूक विहित काळात घेणे शक्य नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६, ६(अ) मधील तरतुदीनुसार पालिकेची मुदत ही पहिल्या बैठकीपासून जास्तीत जास्त पाच वर्षे असल्याने सादर मुदत पुढे ठेवता येत नसल्याने ९ जुलै २०२२पासून पनवेल महानगरपालिकेच्या प्रशासकपदी महापालिका आयुक्त गणेश देशमुख यांची प्रशासक म्हणून नेमणूक करण्यात आल्याचे नगरविकास खात्याचे प्रधान सचिवांनी कळवले आहे. प्रशासकांना आवश्यक निधीला प्रशासक मंजुरी देऊ शकतात.

## लोकसंख्या दिनी सीकेटी महाविद्यालयात अतिथी सत्र

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकसंख्या दिनाचे औचित्य साधून जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेजच्या अर्थशास्त्र विभागाच्या वतीने लोकसंख्या वाढ आणि अर्थव्यवस्थेवरील परिणाम या विषयावर अतिथी सत्राचे सोमवारी (दि. ११) आयोजन करण्यात आले होते. या वेळी वीर वाजेकर महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. राम गोसावी यांची प्रमुख उपस्थिती होती.





कार्यक्रमाची सुरुवात अर्थशास्त्र नियोजन मंडळाच्या पत्रिकेच्या उद्घाटनाने झाली. यानंतर भित्तीपत्रिका स्पर्धेतील विजेत्यांचा प्रमुख पाहुण्याच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. सत्राचे प्रास्ताविक मांडताना अर्थशास्त्र विभागाचे वरिष्ठ प्राध्यापक के. एन. ढवळे यांनी लोकसंख्या वाढ आणि त्यातून निर्माण होणाऱ्या समस्यांवर भाष्य केले.

सत्राचे प्रमुख अतिथी प्रा. राम गोसावी यांनी लोकसंख्या वाढीमुळे होणाऱ्या विविध प्रकारच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिणामांवर प्रकाश टाकला. अंततः अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख प्रो. डॉ. बी. एस. पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले व कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. प्रस्तुत कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. आकाश पाटील यांनी केले. या वेळी ग्रामीण विकास विभागाच्या प्रमुख डॉ. स्मिता भोईर, इंग्रजी विभागाचे प्रमुख डॉ. आर. व्ही. येवले, प्रा. एस. एन. परकाळे, प्रा. रुपाली आगलावे यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख प्रो. डॉ. बी. एस. पाटील, प्रा. के. एन. ढवळे आणि प्रा. हरिभाऊ खरात यांनी विशेष परिश्रम घेतले.

अर्थशास्त्र विभागामार्फत आयोजित विशेष अतिथी सत्राचे आयोजन केल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

## सीकेटी विद्यालयात बुधवारी विद्यार्थी गुणगौरव समारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात (मराठी व इंग्रजी माध्यम) कै. चांगू काना ठाकूर पुण्यतिथी कार्यक्रम व गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव होणार आहे. बुधवारी (दि. १३) दुपारी ४ वाजता होणाऱ्या या कार्यक्रमात उच्च माध्यमिक प्रमाणपत्र व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत यशस्वी झालेल्या प्रज्ञावंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव होईल.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य तथा एमपीएएससी कॉलेजचे प्राचार्य गणेश ठाकूर, तर विशेष पाहुणे म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव प्रा. डॉ. एस. टी. गडदे यांची उपस्थिती लाभणार आहे. यासोबतच पनवेलच्या महापौर डॉ. कविता चौतमोल, नगरसेवक संतोष शेट्टी, समीर ठाकूर, प्रकाश बिनेदार, अॅड. मनोज भुजबळ, नगरसेविका राजश्री वावेकर, सुशीला घरत, अॅड. वृषाली वाघमारे यांची उपस्थिती असेल.

या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन सीकेटी माध्यमिक विद्यालय मराठी माध्यमाचे प्रभारी मुख्याध्यापक कैलास सत्रे, इंग्रजी माध्यम मुख्याध्यापक संतोष चव्हाण व सहकाऱ्यांनी केले आहे.

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : २७

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. क्रिप्टो करन्सी तयार करताना कोणत्या तंत्रज्ञानाचा वापर केला जातो?**

***अ.*** ब्लॉकचेन ***आ.*** मेटा
***इ.*** गुगल ***ई.*** फाईव जी

**२. भारतात टपाल कार्यालयांची एकूण संख्या किती आहे?**

***अ.*** दोन लाख ***आ.*** दीड लाख
***इ.*** एक लाख ***ई.*** चार लाख

**३. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त म्हणजे २०२३ च्या स्वातंत्र्यदिनीकोणत्या ७५ रेल्वेगाड्या सुरु करण्याची घोषणा पंतप्रधानांनी केली आहे?**

***अ.*** राजधानी ***आ.*** तेजस
***इ.*** हमसफर ***ई.*** वंदे भारत

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.

**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

## संपादकीय

# ‘सर्वोच्च’ धावाधाव

पक्षफुटीच्या कड्याच्या टोकावर अधांतरी लोंबकळणाऱ्या शिवसेनेचा आता अस्तित्वासाठीचा लढा सुरू झाल्याचे दिसू लागले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या सोमवारच्या निर्णयामुळे महाराष्ट्रातील राजकीय तिढा आणि त्यावरील निवाडा दीर्घ काळासाठी लांबणीवर पडेल अशी चिन्हे आहेत. हे सारे अर्थातच मुख्यमंत्री शिंदे यांच्या समर्थक गटाच्या पथ्यावरच पडणारे आहे यात शंका नाही.

**महाराष्ट्रातील सत्तांतराच्या नाट्यानंतर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील सरकारची सत्ता तर गेलीच, शिवाय उरलासुरला पक्षदेखील टिकून राहील की नाही याची चिंता निर्माण झाली. या पक्षाच्या सर्व आशा सर्वोच्च न्यायालयाचा निवाड्यावर टांगून राहिलेल्या होत्या. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील आमदारांनी उठावानंतर ‘आम्हीच खरी शिवसेना असल्याचा’ पवित्रा जाहीररित्या घेतला. त्यांनी भारतीय जनता पक्षासोबत तातडीने सरकारदेखील स्थापित केले. ठाकरे समर्थकांचा गट नावापुरता उरला. त्यांनी धावाधाव करीत सर्वोच्च न्यायालयात अर्धा डझन याचिका सादर केल्या. आपल्या ताब्यातील उरलेली शिवसेना वाचवण्याचा हा अखेरचा खटाटोप होता हे लपून राहिले नाही. तथापि, सोमवारी सर्वोच्च न्यायालयाच्या कामकाजात शिवसेनेच्या याचिकांचा उल्लेख न झाल्यामुळे त्यांचे धाबे दणाणले. अखेर तातडीच्या सुनावणीसाठी ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी या याचिकांसंदर्भात सरन्यायाधीशांना विनंती केली, मात्र सरन्यायाधीशांनी तातडीने सुनावणी घेण्यास नकार दिला. सर्व संबंधित याचिका विचारार्थ घेण्यासाठी घटनापीठाची स्थापना करणे आवश्यक आहे. त्यात काही वेळ जाईल असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. यामुळे उरल्यासुरल्या शिवसेनेचा बचाव करण्याच्या प्रयत्नांना दणका बसला आहे. त्याचबरोबर शिंदे सरकारसमोरील अडथळे दूर झाले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेल्या आठवड्यातच शपथ घेऊन कामकाजास प्रारंभ केला होता. तथापि, बाकीचे मंत्रिमंडळ ठरवण्याचे काम बाकी राहिले आहे. ते आता विनासायास पूर्ण करता येईल. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल येईपर्यंत आमदारांच्या अपात्रतेबाबत कोणताही निर्णय घेऊ नये असे निर्देश विधानसभेच्या अध्यक्षांना सरन्यायाधीशांनी दिले आहेत. शिंदे गटाच्या १६ आमदारांना अपात्र ठरवण्याबाबत ठाकरे समर्थक गटाने ही याचिका केली होती. मुख्यमंत्री शिंदे यांना गटनेतेपदावरून दूर करण्यासंबंधी सुनील प्रभू यांनी याचिका दाखल केली होती. शिवसेनेने दाखल केलेल्या मुद्द्यांना आता काही अर्थ उरलेला नाही अशी प्रतिक्रिया शिंदे गटाचे प्रवक्ते दीपक केसरकर यांनी सोमवारी व्यक्त केली. म्हणूनच सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर शिवसेनेचे खासदार अरविंद सावंत यांनी आपला संताप व्यक्त केला आणि संतापाच्या भरात सर्वोच्च न्यायालयावर टीका करण्याचेही सोडले नाही. यातून त्यांचे नैराश्यच दिसते. कायदेशीर लढाईमध्ये बसलेला दणका ताजा असतानाच शिवसेनेच्या अनेक खासदारांनी उठावाचा पवित्रा घेतल्याच्या बातम्या येऊ लागल्या आहेत. राष्ट्रपतिपदाच्या भाजपप्रणित उमेदवार द्रौपदी मुर्मू यांना समर्थन देण्याबाबत शिवसेनेच्या खासदारांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. ठाकरे यांना त्यांचा आग्रह ऐकण्यावाचून पर्यायच उरलेला नाही असे चित्र आहे. ठाकरे यांच्या मातोश्री या निवासस्थानी शिवसेनेच्या खासदारांची बैठक झाली. श्रीमती मुर्मू यांना पाठिंबा देण्याबाबत या बैठकीत खासदारांनी उघडपणे आग्रह धरल्याचे समजते. शिवसेना पक्षप्रमुखांवर अशी वेळ यापूर्वी कधीही आली नव्हती. अस्तित्वाचा प्रश्न उभा राहिला की सर्वोच्च नेत्यालादेखील कार्यकर्त्यांसमोर मान तुकवावी लागते याचे हे द्योतक आहे.**

# आला पावसाळा, सूचना पाळा आणि आपत्ती टाळा!

राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडून नागरी/शहरी पूर आपत्ती प्रसंगी पूर्वतयारी व प्रतिबंधक उपाययोजनांबाबत मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या असून, काय आहेत या मार्गदर्शक सूचना जाणून घेऊया या लेखातून–

प्रत्येक राज्यांमध्ये उच्चतम पूर पातळी ठरविणे. प्रत्येक शहरामध्ये तांत्रिकदृष्टचा सक्षम समन्वय अधिकाऱ्यांसह नागरी पूर/पूर व्यवस्थापन यंत्रणा स्थापित करणे. प्रत्येक शहराने खालील परिस्थिती विचारात घेऊन नागरी पूर व्यवस्थापन आणि उपक्षमन यासाठी प्रमाणित कार्यपध्दती लागू करावी. यात किनारवर्ती शहरे, मुख्य /मोठ्या नद्या, किनाऱ्यावरील शहरे, धरणांजवळील/जलाशयांजवळील शहरे, अंतर्गत शहरे, डोंगराळ प्रदेशातील शहरे, शहरांना वरीलप्रमाणे एक किंवा अनेक वैशिष्ट्ये असू शकतात. नागरी पूर व्यवस्थापनासाठी सर्व भागीदारांची क्षमता बांधणी व उत्तम समन्वयासाठी मान्सूनपूर्व कार्यशाळेचे आयोजन करणे. माहिती जनसंपर्क आणि शिक्षण, प्रत्येक शहराने पूर्वतयारीसह स्थानिक कल्याणकारी प्राधिकारी किंवा अन्य समाजगटांची प्रभागनिहाय यादी तयार ठेवावी व संपूर्ण शहरासाठी त्याचे सहाय्य घेणे.



मान्सूनचे आगमन होण्याच्या बऱ्याच कालावधीपूर्वी शहारातील जलाशयांच्या पाण्याचे शुध्दीकरण तसेच गटारांमधील गाळ प्रभावीपणे काढण्याची कार्यवाही पूर्ण करणे. प्रत्येक शहरातील पाण्याच्या साठ्यांच्या स्थितीचे व मालकी हक्काचे सूचिकरण व मॅपिंग करणे. शहरातील पूर परिस्थितीजन्य भागातील पाण्याचा उपसा करण्यासाठी पंप बसविणे.

विमानतळ असणाऱ्या शहराच्या समन्वय अधिकाऱ्याने पावसाच्या सद्य:स्थिती व भाकितासंबंधीच्या स्थितीबरोबरच चक्रीवादळ व अतिवृष्टीची माहिती भारतीय हवामान विभागाकडून घेणे आवश्यक आहे. ही माहिती METARS या संस्थेकडून दर ३० मिनिटांनी अद्ययावत करण्यात येते. जेव्हा चक्रीवादळ व अतिवृष्टीची स्थिती असते, तेव्हा ही माहिती महानगरपालिकेच्या आयुक्तांना तातडीने कळविणे गरजेचे असते. जेणेकरून ते सावधानता बाळगून त्यावर प्रतिबंधक उपाययोजना करतील. उदा. पूरग्रस्त व अतिवृष्टी क्षेत्रातील शाळा बंद करणे. जलाशयातून/धरणातून पाण्याचा विसर्ग करण्याचा निर्णय जागेवर घेण्याच्या दृष्टीने प्रत्येक शहरासाठी पुरेसे अधिकार असणाऱ्या उच्चस्तरीय तज्ञ समितीची स्थापना करणे. या समितीला, अतिवृष्टीच्यावेळी पाण्याच्या विसर्गाच्या भाकिताचा आढावा घेऊन जलाशयाची/धरणाचीद्वारे उघडून पाण्याचा विसर्ग करण्याचे अंतिम अधिकार राहील.

जलाशयातून/धरणातून पाण्याचा विसर्ग केला असता शेजारील राज्यांना ती माहिती त्याचवेळी देणे. प्रत्येक राज्य/जिल्हा प्राधिकरणाने धोका नकाशा तयार करणे गरजेचे आहे. जेणेकरून उपलब्ध साधनांचा पुरेपूर वापर करता येईल. पूराच्या मुख्य कारणांमध्ये अतिवृष्टी व बर्फ वितळणे यांचा समावेश होतो. त्यामुळे बर्फ वितळणे, ढगफुटीमुळे उद्‌भवणाऱ्या परिस्थितीत धरणातून केला जाणारा पाण्याचा विसर्ग यावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. आपत्तीच्या परिस्थितीचा पुर्वानुमान बांधून आपत्तीमध्ये लागणाऱ्या मूलभूत बाबी म्हणजे पाणीपुरवठा, अन्नपुरवठा, वैद्यकीय सोयी, स्वच्छतेच्या सोयी इत्यादीची माहिती शासनाने संग्रहित करून ठेवणे गरजेचे आहे. जेणेकरून आपत्तीच्या वेळी मदत पोहोचविणे सहज शक्य होईल. आपत्ती संबंधातील माहिती त्याचवेळी मिळण्यासाठी राज्याने पूरनियंत्रण सॉफ्टवेअर विकसित करणे.

शासनाने प्रत्येक जिल्ह्याला आपत्ती सरावासाठी एक लाख रुपये राखून ठेवावे. राज्याने या निधीचा विनियोग विचारपूर्वक पध्दतीने करणे. आपत्तीमध्ये काय करावे व काय करू नये, याबाबतची माहिती जाहिरातीद्वारे स्थानिक भाषेत देणे. राज्याने हवामानाच्या वृत्तांतासाठी प्रादेशिक भारतीय हवामान विभागाच्या संपर्कात राहावे. राज्याने पुराच्या अंदाजासाठी केंद्रीय जल आयोगाच्या संपर्कात राहणे. किनारपट्टीच्या भागामध्ये छत नसलेल्या घरांच्या सुरक्षेसाठी यु आकाराच्या गळाचा वापर करणे. झाडांची नियमित छाटणी योग्य प्रकारे होते की नाही, तसेच जनजागृतीचे / जाहिरातीचे फलक सुस्थितीत आहेत की नाही याची खात्री करणे. तसेच वज्राघात झाल्यास काय करावे व काय करू नये–सतर्कतेची/चेतावणी चिन्हे: अतिवेगवान वारे, अतिपर्जन्य आणि काळे ढग, घोंघावणारे गडगडाटी वादळ, जवळचे झंझावात, जास्त किंवा अधिक जास्त प्रमाणात मेघगर्जना. वस्तुस्थितीमध्ये वीज ही सामान्यपणे उंच वस्तूंवर पडते, कोणतेही स्थान हे पूर्णपणे सुरक्षित नाही परंतू काहीस्थाने इतर ठिकाणापेक्षा सुरक्षित आहेत. मोठी बांधकामे छोट्या किंवा खुल्या बांधकामांपेक्षा जास्त सुरक्षित असतात. जास्त पाऊस पडणाऱ्या क्षेत्राच्या बाहेरही वज्राघात होऊ शकतो. वज्राघात सतत एकाच ठिकाणी होऊ शकतो, अशा परिस्थितीत सामान्यतः बाहेर पडलेल्या व्यक्ती वज्राघातामुळे जखमी किंवा मृत्यू पावतात. वज्राघात बाधीत/जखमी व्यक्तीस तुम्ही मदत करू शकता. यामध्ये त्याच्या शरीरात कुठल्याही प्रकारचा विद्युत प्रवाह सुरु नसतो. त्या व्यक्तीस तत्काळ/त्वरीत मदत करावी. काय करावे– पूर्वतयारीमध्ये वज्राघातापासून बचावासाठी भित्तीचित्रे/भित्तीपत्रके प्रदर्शित करा. आपल्या भागातील स्थानिक हवामानाविषयी अंदाजाची व सतर्कतेच्या माहितीचे निरीक्षण करा. स्वतःसाठी व कुटुंबासाठी वज्राघाताच्या आपत्कालीन परिस्थितीत वैद्यकीय सेवेसंदर्भात तसेच स्थानिक प्रशासकीय यंत्रणेसंदर्भात संपर्क करण्यासाठीचा आराखडा तयार करा.

वैद्यकीय व स्थानिक आपत्कालीन सेवांचे संपर्क तपशील तयार करणे. आपत्कालीन साधने तयार ठेवा. जर गडगडाटी वादळाचा/अतिवेगाने वाहणाऱ्या वादळी वाऱ्यांचा अंदाज असेल तर घराबाहेर/घराबाहेरील क्रीया पुढे ढकलणे. विजेवर चालणाऱ्या वस्तू, इलेक्ट्रीक व इलेक्ट्रॉनिक वस्तू आणि वातानूकुलित यंत्रे बंद ठेवावीत. आपल्या घराच्या आजूबाजूची वाळलेले झाडे किंवा मृत झाडे फांद्या काढून टाकणे. तुमच्या परिसरात वादळीवारे वाहत असल्यास /वीज चमकत असल्यास आणि घरात असल्यास घराच्या खिडक्या व दरवाजा बंद ठेवा. घराचे दरवाजे, खिडक्या, कुंपणापासून दूर राहावे. मेघगर्जना झाल्यापासून ३० मिनिटे घराच्या आतच राहावे. घराबाहेर असल्यास त्वरीत सुरक्षित निवाऱ्याच्या ठिकाणाकडे प्रस्थान करावे, ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटरसायकल, सायकल यांच्यापासून दूर राहावे. गाडी चालवत असल्यास, सुरक्षितस्थळी जाण्याचा प्रयत्न करा व गाडी सुरक्षित ठिकाणी लावताना मोठ्या झाडांपासून तसेच पूराचे पाणी येत असल्यास अशी ठिकाणी वगळून लावाव्यात. खुल्या ठिकाणांपेक्षा सामान्यतः खिडक्या बंद असलेल्या धातूपासून तयार झालेली वाहने चांगली आश्रयस्थळे होऊ शकतात. उघड्यावर असल्यास, शेवटचा पर्याय म्हणून लगेच गुडघ्यावर बसून हाताने आपले कान झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्यांच्या मध्ये झाकावे. जमिनीशी कमीत कमी संपर्क असावा.

मोकळ्या तसेच लटकत्या विद्युत तारांपासून दूर राहावे. जंगलामध्ये दाट, लहान झाडांखाली, उताराच्या जागेवर निवारा घ्यावा, इतर खुल्या जागेवर जाण्याचा प्रयत्न करावा. जर जमिनीच्यावर पाणी आल्यास ताबडतोब सुरक्षित निवारा शोधून काढावा. वज्राघात झाल्यास त्वरीत वैद्यकीय मदत बोलवावी. सूचनांचे काटेकोरपणे पालन करून आपत्तीशी सामना करण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे.

**–मनोज शिवाजी सानप,**
जिल्हा माहिती अधिकारी,
रायगड–अलिबाग.



## बदलते तंत्रज्ञान




## व्हॉट्सअ‍ॅप आता मेसेजसंदर्भात आणणार आणखी एक फिचर

व्हॉट्सअ‍ॅप सतत नवनवीन फीचर्सवर काम करत आहे. वापरकर्त्याचा अनुभव सुधारण्यासाठी कंपनी सतत बदल करत असते. मिळालेल्या माहितीनुसार व्हॉट्सअ‍ॅप एक नवीन फीचर आणण्यावर काम करत आहे. या फीचरला कंपनीने ’कम्पेनियन मोड’ असे नाव दिले आहे. हे वैशिष्ट्य एकाधिक उपकरणांमधील चॅट इतिहास सिंक करण्यास मदत करेल.

सुरक्षितरित्या व्हॉट्सअ‍ॅप हाताळण्याच्या काही सोप्या ट्रिक्स आहेत. अशा वैशिष्ट्यांची बऱ्याच काळापासून मागणी केली जात होती. हे वैशिष्ट्य डेटाची देवाणघेवाण करण्याचे एक साधन बनेल. हे फीचर आल्यानंतर डेटा एका डिव्हाइसवरून दुसऱ्या डिव्हाइसवर सहजपणे हस्तांतरीत करता येणार आहे. हे दोन उपकरणांमधील पूल म्हणून काम करेल. युजर्सची सोय लक्षात घेऊन आता असे फीचर देखील लवकरच येऊ शकते, ज्यामध्ये मोबाइलशिवाय व्हॉट्सअ‍ॅप सिस्टमवर लॉग इन केले जाऊ शकते.

व्हॉट्सअ‍ॅपवरील नवीन फीचरबद्दल बोलायचे झाले तर ते दुय्यम मोबाइल डिव्हाईसवरून सहज लॉग इन केले जाऊ शकते तसेच डिव्हाइसच्या सर्व चॅट्स कम्पेनियन डिव्हाइसवर कनेक्ट करण्यास सक्षम असतील. ही प्रक्रिया पूर्ण होण्यास थोडा वेळ लागणार आहे, त्यामुळे व्हॉट्सअ‍ॅप वेबवरही हीच मेसेजिंग यंत्रणा आणण्याचा प्रयत्न करत आहे. आता जुने मेसेज पाहण्यासाठी मोबाइलचा वापर करावा लागतो. व्हॉट्सअ‍ॅप एक नवीन फीचर आणणार आहे. यामध्ये तुम्ही दोन दिवसांनंतरही मेसेज डिलीट करू शकाल. तर आता तुम्हाला मेसेज डिलीट करण्यासाठी एक तासाचा अवधी देण्यात आला आहे. मेसेज डिलिट करण्याची वेळ वाढविण्याची मागणी बऱ्याच दिवसांपासून होत होती. आता व्हॉट्सअ‍ॅपनेही या नव्या फीचरवर काम सुरू केले. तसेच काही वेळात लॉन्च केले जाईल. ट्रायल व्हर्जनवर एक नवीन फीचरदेखील दिले जात आहे. सुरक्षितरित्या व्हॉट्सअ‍ॅप हाताळण्याच्या वेगवेगळ्या ट्रिक्स वापराव्या लागतात.

# पर्यावरण रक्षणासाठी प्लास्टिकऐवजी कागदी पिशव्यांचा पर्याय

प्लास्टिक पिशवीचे पूर्णपणे विघटन होण्यास जवळपास १०० ते १५० वर्षे लागतात. आपल्या पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी प्लास्टिकऐवजी कागदी पिशवी वापरावी या हेतूने दरवर्षी १२ जुलै रोजी सर्वत्र कागदी पिशवी दिवस म्हणून साजरा केला जातो. खरेतर पर्यावरणाच्या रक्षणासाठी आपण कागदी पिशवीचा प्रामुख्याने वापर करायला हवा. मात्र आज सऱ्हास प्लास्टिकचा वापर सुरु आहे. सिंगल युज प्लास्टिक वापरु नयेत म्हणून शासनाने बंदी घातली आहे. तरीही उत्पादक आणि विक्रेते विविध मार्ग काढत प्लास्टिक मुक्तीलाच तिरांजली देत आहेत. ग्राहकांकडूनही दुकानांमध्ये प्लास्टिकची सतत मागणी असते. दरम्यान, प्लास्टिक पिशव्यांना पर्याय म्हणून कागदी पिशव्यांचा वापर पुढे आला आहे. आजच्यादिनी काही माहिती आपण या लेखातून बघणार आहोत.



प्लास्टिकमुळे होणारे प्रदूषण आणि नैसर्गिक वातावरणास निर्माण होणाऱ्या गंभीर धोक्याबद्दल लोकांना जागरूक करण्यासाठी आजचा हा दिवस साजरा केला जातो. प्लास्टिकचा कचरा संपूर्णपणे नष्ट होण्यासाठी हजारो वर्षे लागतात. हे प्लास्टिक लवकर नष्ट न झाल्यामुळे पृथ्वीवर याचे ढीग साठायला सुरुवात झाली आहे. केवळ एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक पिशव्यांचे दुष्परिणाम समजून घेणे महत्त्वाचे आहे. प्लास्टिकच्या पिशव्यांऐवजी जास्तीत जास्त कागदी पिशव्यांचा वापर करा. तसेच काही कारणामुळे प्लास्टिकच्या पिशव्यांचा वापर करावा लागल्यास त्या पिशवीला रिसायकल करायला कधीही विसरू नका.

कागदी पिशव्यांचा इतिहास–१८५२

### निमित्त

मध्ये अमेरिकन शोधक फ्रान्सिस वोले यांनी प्रथम कागदी पिशवी बनवायची मशीन तयार केली. पुढे १८७१मध्ये मार्गारेट ई नाइटने आणखी एक मशीन बनविली, जी फ्लॅटबॉटम कागदी पिशवी तयार करू शकत होती. लोकांकडून तिला चांगलीच पसंती मिळाली आणि ‘किराणा पिशवी’ म्हणून ओळखली जाऊ लागली. १८८३मध्ये चार्ल्स स्टिलवेलने मशीनचा शोध लावला. ज्यामुळे चौकोनी बॉटम असलेल्या कागदाच्या पिशव्या तयार केल्या जाऊ लागल्या. १९१२मध्ये वॉल्टर डिबेनरने कागदाच्या पिशव्या अधिक मजबूत करण्यासाठी त्याला हँडल बसविले. वर्षानुवर्षे अनेक प्रयोग होत कागदी पिशव्यांचे उत्पादन सुधारले.

कागदी पिशव्या वापरण्याचे फायदे या प्रमाणे आहेत. यात कागदी पिशव्या वापरणे पर्यावरणपूरक आहे. कागदी पिशव्यांना सहज रिसायकल करता येऊ शकते. कागदी पिशव्या या सहज नष्ट होऊ शकतात. कागदी पिशव्या वापरण्यास स्वस्त आहेत. खराब कागदी पिशव्यांचा वापर तुम्ही घरी खत बनवतांनाही करू शकता. कागदी पिशव्या त्यांच्या सुंदर रंगामुळे आणि त्यावरील प्रिंट्समुळे वापरायला जास्त छान वाटतात. या पिशव्या वापरताना वापरकर्त्यांनाही एक वेगळा लूक येतो. दरम्यान, आजच्या कागदी पिशव्यांच्या दिनानिमित्त आपण काहीतरी बोध घेऊन पर्यावरण रक्षणाला मदत करणे हे प्रत्येक भारतीयाचे आद्य कर्तव्य आहे.

### क्लिक...क्लिक...!



**पनवेल : सगळीकडे पावसाचा जोर वाढल्याने नद्या–नाले तुडूंब भरून वाहत आहेत. अशा वेळी रस्त्यालगतचे खळाळून वाहणारे धबधबे, ओढे पर्यटकांना आकर्षित करीत आहेत. अशाच निसर्गरम्य कर्नाळा परिसरातील तारा गावाजवळून वाहणाऱ्या एका ओहोळाचे दृश्य टिपले आहे छायाचित्रकार लक्ष्मण ठाकूर यांनी.**

## आरोग्य प्रहर

## कोलेस्ट्रॉल वाढल्यास जाणून घ्या माहिती

जेव्हा तुमच्या रक्तात कोलेस्ट्रॉल नावाचा चरबीयुक्त पदार्थ जास्त असतो, तेव्हा उच्च कोलेस्ट्रॉल उद्‌भवते. हे प्रामुख्याने चरबीयुक्त पदार्थ खाणे, पुरेसा व्यायाम न करणे, वजन जास्त असणे, धुम्रपान आणि दारू पिणे यामुळे होते.

उच्च कोलेस्ट्रॉल बऱ्याच बाबतीत अनुवंशिकदेखील आहे. खूप जास्त कोलेस्ट्रॉल तुमच्या रक्तवाहिन्या ब्लॉक करू शकतात. या मुळे काळजी घेतली पाहिजे. उच्च कोलेस्ट्रॉल हृदयाशी संबंधित आजार किंवा पक्षाघात होण्याची शक्यता वाढते. उच्च कोलेस्ट्रॉल घातक ठरू शकते आणि अचानक मृत्यूचा धोकादेखील असतो. जेव्हा व्यक्तीच्या शरीरात कोलेस्ट्रॉलचे प्रमाण जास्त असते, तेव्हा या काळात डोळ्यांमध्ये काही बदल दिसून येतात. यामध्ये डोळ्यांच्या कोपऱ्याभोवती पिवळ्या आणि केशरी रंगाचा थर जमू लागतो. हे त्वचेखाली कोलेस्ट्रॉल जमा झाल्यामुळे होते.



डोळ्यांच्या त्वचेची स्थिती जाणून घेतली पाहिजे. यामध्ये, पायांच्या त्वचेवर आणि तळव्याच्या मागील भागावर पिवळसर मेणाचा थर जमा होऊ लागतो. तुमचे कोलेस्ट्रॉल नियंत्रणात ठेवल्यास त्यातून सुटका मिळू शकते.

एका ताज्या संशोधनामध्ये सोरायसिस आणि उच्च कोलेस्ट्रॉल पातळी यांच्यातील संबंध आढळून आला आहे. याला हायपरलिपिडेमिया म्हणतात. या शब्दात अनेक विकारांचा समावेश आहे. ज्यामुळे तुमच्या रक्तातील अतिरिक्त चरबी, ज्याला लिपिडदेखील म्हणतात. हायपरलिपिडेमिया उपचार करण्यायोग्य आहे, परंतु ही बऱ्याचदा आयुष्यभराची स्थिती असते. संतुलित जीवनशैली यापासून मुक्त होण्यास मदत करू शकते. याचे असे आहे कारण उच्च कोलेस्ट्रॉलची पातळी तुमच्या त्वचेखालील रक्तप्रवाह कमी करू शकते. त्वचेच्या पेशींना पुरेसे पोषण मिळत नाही आणि त्वचेचा रंग बदलतो. तुम्ही जास्त वेळ उभे राहिल्यास तुमचे पाय जांभळे होऊ शकतात. तुमचे पाय उंचावल्यास त्वचा पिवळी होऊ शकते. याबाबत यातील तज्ञ रिंकी कपूर यांनी उच्च कोलेस्टेरॉलचा त्रास असलेल्या रुग्णांना सल्ला देताना सांगितले आहे की, तुमच्या आरोग्याची चांगली काळजी घेतल्यास कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रणात राहते आणि त्वचेच्या समस्या टाळण्यासही मदत होते. ही माहिती फक्त सामान्य माहितीवर आधारित आहे. हे कोणत्याही प्रकारे कोणत्याही औषधाचा किंवा उपचारांचा पर्याय असू शकत नाही. अधिक तपशीलांसाठी नेहमी आपल्या डॉक्टरांशी संपर्क साधावा.

# पाणीपट्टी दरवाढीविरोधात खोपोली भाजप आक्रमक

## ■ नगरपालिका मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगरपालिका प्रशासनाने नुकताच पाणीपट्टीमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला असून, याबाबत विविध वर्तमानपत्रात पाणीपट्टी दरवाढीची जाहिरात प्रसिद्ध केली आहे. खोपोली भारतीय जनता पक्षाने या पाणीपट्टी वाढीस तीव्र विरोध दर्शवला असून, ही पाणीपट्टी वाढ तात्काळ मागे घेण्यात यावी, अशी मागणी खोपोली नगरपालिकेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक अनुप दुरे यांच्याकडे सोमवारी (दि. ११) निवेदनाद्वारे केली.



(छाया : विनायक माडप)

कोरोनामुळे गेल्या दोन वर्षापासून नागरिक त्रस्त झाले असून, त्यामुळे अनेकांना आर्थिक फटका बसला आहे. अनेकांनी नोकऱ्या गमावल्या, अनेक संसार रस्त्यावर आले तर व्यवसायीक आजही आर्थिक संकटातून अजूनही सावरलेले नाहीत. अशा परिस्थितीत पाणीपट्टी वाढीचा निर्णय घेण्यात आला आहे. तो अयोग्य आहे त्याचा नगरपालिका प्रशासनाने फेर विचार करावा, असे भाजप तर्फे देण्यात आलेल्या निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

खोपोली भारतीय जनता पक्ष सरचिटणीस हेमंत नांदे, महिला मोर्चा शहराध्यक्ष शोभाताई काटे, सरचिटणीस अश्विनी अत्रे, युवामोर्चा शहराध्यक्ष अजय इंगुलकर, वैद्यकीय सेलचे विकास खुरपडे, सागर काटे यांच्यासह इतर पदाधिकारी या वेळी उपस्थित होते. निवेदन स्वीकारून मुख्याधिकारी अनुप दुरे यांनी, पाणीपट्टी वाढीबाबत विचार केला जाईल, असे आश्वासन दिल्याचे नांदे यांनी प्रसारमाध्यमांना सांगितले.

# कर्जतमध्ये एनएमएमटीच्या बसेसना मिळेना हक्काचा थांबा

(छाया : संतोष पेरणे)




**कर्जत : बातमीदार**

एसटी कर्मचाऱ्यांचा संप सुरु असताना प्रवाशांच्या सेवेसाठी नवी मुंबई महानगरपालिकेने आपली परिवहन सेवा (एनएमएनटी) कर्जतपर्यंत सुरू केली, मात्र एनएमएनटीच्या बसेस उभ्या करण्यासाठी त्यांना कर्जतमध्ये हक्काची जागा (स्थानक) नाही. परिणामी त्या बसेस एसटी आगाराबाहेर रस्त्यावर थांबत असल्याने वाहतुकीला अडथळे निर्माण होत आहे.

कोरोना काळात कर्मचाऱ्यांनी संप केल्याने कर्जत एसटी आगार बंद पडला होता. त्यावेळी स्थानिक प्रवाशांच्या मागणीनंतर नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिवहन विभागाने बेलापूर-कर्जत बस सेवा सुरु केली होती. त्या वेळी एनएमएनटीच्या बस एसटीच्या कर्जत आगारात उभ्या रहात होत्या व तिथूनच त्या सुटत होत्या. त्यामुळे कर्जत-पनवेल मार्गावरील प्रवाशांना एनएमएमटीच्या बसचा उपयोग करता आला.

दरम्यान, कर्मचाऱ्यांचा संप मिटल्यानंतर कर्जत एसटी आगार पूर्ण क्षमतेने सुरू झाला. त्यामुळे आगार व्यवस्थापक एनएमएमटीच्या बस एसटी स्थानकात उभी करून देत नाहीत. त्यामुळे एनएमएमटीचे चालक नाईलाजास्तव आपल्या बस कर्जत एसटी आगाराबाहेर रहदारीच्या रस्त्यावर उभ्या करीत आहे.

एनएमएमटीच्या बसेसना कर्जत शहरात गाड्या उभ्या करण्यासाठी आणि काही वेळ थांबण्यासाठी हक्काची जागा नाही. या गाड्या भिसेगाव-गुंडगे रस्त्यावर थांबत आहेत. हा रस्ता रहदारीचा आहे. नागरिक बाजारहाट तसेच रेल्वे पकडण्यासाठी, विद्यार्थी शाळेत जाण्यासाठी या रस्त्याचा वापर करतात. एनएमएमटी बसेस या रस्त्यावर उभ्या रहात असल्याने वाहतुकीला अडसर होत असून अपघात होण्याची शक्यता वाढली असल्याने एनएमएमटीच्या बसेस एसटी स्थानकात उभ्या कराव्यात, अशी मागणी या परिसरातील नागरिक करत आहेत. संबंधित अधिकाऱ्यांनी तसेच कर्जत पोलीस ठाण्याच्या वाहतूक शाखेने लक्ष घालून ही समस्या सोडवावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# महिलेला मारहाण करून जीवे मारण्याची धमकी

## ■ आरोपीवर माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**माणगाव : प्रतिनिधी**

मारहाण व शिवीगाळी करून निळज आदिवासीवाडी येथील महिलेला ठार मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी विमल प्रकाश हिलम (वय ४०) व आरोपी सुरेश बळीराम हिलम हे एकच गावातील निळज आदिवासीवाडी येथील रहिवासी आहेत. आरोपी सुरेश हा दारू पिऊन येऊन गावात कोणालाही काही कारण नसताना शिवीगाळी करत असतो. रविवारी रात्री ग्रामस्थांची बैठक चालू असताना साक्षीदार प्रकाश रामा हिलम (वय ४५) हे आरोपी सुरेशला बोलले की, तू दारू पिऊन कोणालाही शिवीगाळी करत जाऊ नकोस. त्याचा राग येऊन सुरेश याने प्रकाश हिलम यांना हाताबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. फिर्यादी विमल या त्यांचे भांडण सोडवण्याकरिता गेल्या असता सुरेशने त्यांनाही हाताबुक्क्यांनी मारहाण, शिवीगाळी करून हातातील लाकडी काठी पाठीत मारली व जिवे ठार मारण्याची धमकी दिली. त्यात विमल हिलम या जखमी झाल्या.

या प्रकरणी विमल हिलम यांनी दिलेल्या फिर्यादीवरून माणगाव पोलीस ठाण्यात सुरेश बळीराम हिलम याच्या विरोधात भादवि संहिता कलम ३२४,३२३,५०४,५०६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास हवालदार श्री. दोडकुळकर करीत आहेत.

# अलिबाग तालुक्यातील पाल्हे पुलावर धोकादायक खड्डे


(छाया : महेंद्र खैरे)

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील नागाव बायपास रस्त्यावरील पाल्हे पुलावर व परिसरात मोठ मोठे खड्डे पडले असून, मात्र तेथून बिनधोकपणे वाहतूक सुरू आहे.

अलिबाग-रेवदंडा मार्गावरील नागाव बायपास रस्त्यावर पाल्हे गावाजवळ पूल आहे. हा पूल कमकुवत असल्याचा फलक सार्वजनिक बांधकाम खात्याने लावला आहे. ऐन पावसाळ्यात या पुलावर आणि पुलाच्या दोन्हीबाजूकडील रस्त्यावर मोठमोठ खड्डे पडले आहेत. त्यामुळे या पुलावरून वाहतूक करणे धोकादायक झाले आहे. या पाल्हे पुलाला नागाव गावातून पर्यायी मार्ग उपलब्ध आहे. तरीही या पुलावरून मोठ्या संख्येने वाहनांची जा-ये सुरूच आहे. सार्वजनिक बांधकाम खात्याने यापुर्वीच पाल्हे पुलावरून अवजड वाहतुकीस बंदी केली आहे, मात्र तरीही या मार्गाने रात्रीच्यावेळी अवजड वाहतूक होत असल्याची स्थानिक ग्रामस्थांची तक्रार आहे.

पाल्हे पुलावरून होत असलेली अवजड वाहतूक बंद करावी, तसेच सार्वजनिक बांधकाम खात्याने या पुलाची व जोड रस्त्यांची तातडीने डागडूजी करावी, अशी मागणी परिसारातील ग्रामस्थ करीत आहेत.

# चौक विद्यालयात आषाढी एकादशीनिमित्त दिंडी

**चौक : रामप्रहर वृत्त**

विद्या प्रसारिणी सभा या संस्थेच्या चौक येथील प्राथमिक विद्यामंदिर व शिशूमंदिर शाळेमध्ये शनिवारी (दि. ९) आषाढी एकादशी कार्यक्रम मोठ्या उत्साहात करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री देवानंद कांबळे यांनी केले. संस्थेचे उपाध्यक्ष संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. अविनाशजी देशमुख यांनी वारीची परंपरा सांगितली. या वेळी सरनोबत नेताजी पालकर विद्यामंदिरच्या प्रांगणात दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सावी शिंदे, सिद्धि गावडे, प्रथम ठोंबरे, वरद घुमरे, प्रचिती देशमुख, चिन्मयी भोईर, चैतन्या भोईर, पियांशी ठोंबरे, चैतन्या भोईर, चिन्मयी भोईर, मनाली सावंत, पूर्वी येरुणकर, आरोही जाधव, मुग्धा ठोंबरे या तिसरी यत्तेतील मुलींनी अभंग, हरिपाठ, आरती, पसायदान सादर केले. त्यांना मयुरेश भोईर व धीरज गायखे यांनी पखवाज व ढोलकीची साथ दिली. संस्थेचे सेक्रेटरी योगेंद्र शहा यांनी विठ्ठल भेटीला हे गाणे सादर केले.

प्राथमिक विद्यामंदिर व शिशुमंदिरचे समन्वयक देवानंद कांबळे सिप्ला फाउंडेशनच्या उल्का धुरी यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक, पालक या वेळी उपस्थित होते. दीपक शिंदे यांनी आभार मानले





# कर्जतमधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

(छाया : विजय मांडे)

**कर्जत : प्रतिनिधी**

महिला मंडळ संचलित कर्जतमधील विद्या विकास मंदिर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांना सेवा सहयोग मुंबई या संस्थेकडून शालेय साहित्यासह दप्तरांचे वाटप करण्यात आले.

महिला मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी टेक महिंद्राच्या कल्पना दिवाडकर यांच्याशी संपर्क साधून विद्यार्थ्यांसाठी सहकार्य करण्याची विनंती केली होती. ती तत्काळ मान्य करून मुंबईतील सेवा सहयोग संस्थेच्या वतीने शालेय साहित्यासह दप्तरे उपलब्ध करून देण्यात आली.

संस्थेच्या कार्याध्यक्ष मीना प्रभावळकर यांच्या हस्ते हे साहित्य विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले.



विद्या विकास मंदिर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका स्नेहा गाढे, पर्यवेक्षिका श्रद्धा मुंढेकर, प्रेमा पितळे, मेघा पिंगळे, वृषाली माळी, शारदा राठोड, नीलम बडेकर आदींसह शिक्षिका व विद्यार्थी या वेळी उपस्थित होते.

# नागोठण्यात स्मशानभूमीला शेड बसविण्याकडे ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष


(छाया : राज वैशंपायन)

> वारंवार पत्रव्यवहार करूनदेखील नागोठणे ग्रामपंचायत ब्राह्मण समाजाच्या स्मशानभूमीतील समस्यांकडे कानाडोळा करत आहे. ग्रामपंचायतीने या स्मशानभूमीतील समस्या तातडीने सोडवाव्यात.
> -श्रेया कुंटे, उपाध्यक्ष, रायगड जिल्हा भाजप

**नागोठणे : प्रतिनिधी**

नागोठणेमधील ब्राह्मण समाजाच्या स्मशानभूमीत शेड नसल्याने मृतदेहाची अवहेलना होत असून या स्मशानभूमीतील समस्या सोडविण्याकडे ग्रामपंचायत कानाडोळा करीत असल्याचा आरोप भाजप रायगड जिल्हा उपाध्यक्ष श्रेया कुंटे यांनी केला आहे.

ब्राह्मण समाजाच्या स्मशानभूमीत शेडची उभारणी झालेली नाही आहे. तेथील चौथरा जीर्ण अवस्थेमध्ये आहे. पाणी व रात्रीच्या वेळेस दिव्यांची व्यवस्था नाही. या स्मशानभूमी परिसरामध्ये झाडेझुडपे वाढली आहेत. त्यामुळे अंत्यसंस्कारासाठी आलेल्या नागरिकांची गैरसोय होत आहे. मृत व्यक्तीचे नातेवाईक व अंत्यविधीसाठी आलेल्या नागरिकांचे ऊन-पावसापासून संरक्षण होईल यासाठीदेखील कुठल्याही प्रकारची व्यवस्था याठिकाणी नाही. त्याबाबत श्रेया कुंटे यांनी नागोठणे ग्रामपंचायतीला १० फेब्रुवारी २०२२ रोजी दिलेल्या निवेदनाची दखल अद्यापही घेण्यात आलेली नाही.

या बाबत नागोठणे ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी मोहन दिवकर यांना संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता तो होऊ शकला नाही.

# खालापुरातील नढाळ येथे क्षुल्लक कारणावरून मुलाने घेतला बापाचा जीव

**खोपोली : प्रतिनिधी**

वडिलांनी दुचाकी घरात आणून ठेव सांगितले, या क्षुल्लक कारणातून मुलाने बापाचा गळा दाबून खुन केल्याची घटना खालापूर तालुक्यातील नढाळ ठाकूरवाडीत घडली आहे.

नढाळ ठाकूरवाडीत राहणारे चाहू कानू निरगुडा (वय ५०) यांनी मुलगा भास्कर (वय ३०) याला दुचाकी घरात आणून ठेव, असे सांगितले. भास्करला त्याचा राग आला. दोघांमध्ये वाद होऊन कडाक्याचे भांडण झाले. भास्करने वडिलांना धक्काबुक्की करून खाली लादीवर पाडून त्यांचा गळा दाबून जिवेठार मारले. या घटनेमुळे नढाळ ठाकूरवाडीत खळबळ उडाली.




आरोपी भास्कर विरोधात खालापूर पोलीस ठाण्यात भादंवि कलम ३०२, ३२३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहाय्यक निरीक्षक युवराज सुर्यवंशी करीत आहेत.


## कुळगांव बदलापूर नगरपरिषद

नगरपरिषद दुबे रुग्णालय इमारत, पहिला मजला, आदर्श विद्यामंदिर रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन-४२१५०३. ता. अंबरनाथ जि. ठाणे.
ईमेल :- coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in वेबसाईट :- http://kbmc.gov.in

जा.क्र./कुबनप/भांडार विभाग/६३८८/२०२२-२०२३ दिनांक :- ११/०७/२०२२.

### जाहीर कोटेशन सूचना ००२

सर्व मक्तेदार / पुरवठादार यांना कळविण्यांत येते की, कुळगांव बदलापूर नगरपरिषदेच्या कै. बी. एस. दुबे रुग्णालयाकरिता आवश्यक औषधीचा पुरवठा करावयाचा आहे. सबब ईच्छुकांनी औषधाचे दराचे कोटेशन सिलबंद पाकिटात दिनांक २०/०७/२०२२ पावेतो कार्यालयीन वेळेत या कार्यालयास सादर करावे. नमूद दिनांकानंतर प्राप्त होणाऱ्या कोटेशनचा विचार करण्यात येणार नाही. सदर कोटेशन दराबाबत मा. मुख्याधिकारी, कुळगांव बदलापूर नगरपरिषद यांनी सर्वाधिकार राखून ठेवले आहेत. औषधाचे सूची / यादी भांडार विभाग, कुबनप यांचेकडून प्राप्त करून घेणेत यावेत.

| अ.क्र. | कामाचे नांव |
|---|---|
| १ | कुळगांव बदलापूर नगरपरिषदेच्या कै. बी. एस. दुबे रुग्णालयाकरिता लागणारे आवश्यक औषधीचा पुरवठा करणेकरिता दर सादर करणे. |

उक्त नमूद कामांबाबत अधिक माहितीकरिता भांडार विभाग, कुळगांव बदलापूर नगरपरिषद यांचेशी संपर्क करावा.

सही/
(योगेश गोडसे)
मुख्याधिकारी
कुळगांव बदलापूर नगरपरिषद,
कुळगांव.



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल **१) श्री. दिपक कमलाकर म्हात्रे आणि २) श्री. अमरजीत देवराज पाल,** यांनी खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे/जमीन मालकांबरोबर बोलणी करून बयाना (टोकन) न देता सदर मिळकत खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे कुडावे, ता. पनवेल, जि. रायगड**

| भोगवटादाराचे नाव | गट क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर. चौ.मी. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| श्री. राजाराम शांताराम कोंडीलकर | ४१/४ | ०-०५-१०<br>पो.ख. ०-००-५०<br>एकूण ०-०५-६० | १.०० |

वर वर्णन केलेल्या मिळकतीवर मालक/भोगवटादार अशी नावे असलेल्या व्यक्ती म्हणजेच **श्री. राजाराम शांताराम कोंडीलकर** यांच्या नावाची नोंद आहे. तरी सदर वर वर्णन केलेल्या मिळकतीशी कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, वारसाहक्क, वहिवाट, साठेकरार, खरेदीखत, पोटगी, एम.ओ.यू. अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्या व्यक्तीने वर नमूद केलेल्या हक्काबाबत त्यांच्याजवळ असलेल्या योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदरची नोटीस राम प्रहर वर्तमानपत्रामध्ये प्रसिद्ध झाल्यापासून **१५ (पंधरा)** दिवसापर्यंत खालील पत्त्यावर लेखी हरकत घ्यावयाची आहे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत नोंदविली नाही तर, वर नमूद केलेला व्यवहार पूर्ण केला जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**पनवेल,**
**दिनांक :- १२/०७/२०२२**

**सही/-**
**ॲड. अतिश सुनील परदेशी**
**ॲड. हायकोर्ट**
**गाळा नं. ७, फडके नाट्यगृह कॉम्प्लेक्स,**
**श्री समर्थ कृपा झेरॉक्स, पनवेल,**
**ता. पनवेल, जि. रायगड**
**मोबा. नं. ९७०२८९८९८९**



## जाहीर प्रसिद्धीकरण

पनवेल महानगरपालिका पगारदार नोकरांची सहकारी पतसंस्था मर्या., पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेच्या सन २०२२ ते २०२७ या कालावधीचे पंचवार्षिक निवडणुकीचे मतदान दि. १६/०७/२०२२ रोजी सकाळी ०८:०० ते दुपारी ०४:०० वाजेपर्यंत संस्थेच्या कार्यालयात, पनवेल महानगरपालिका शेजारी घेण्यात येणार आहे. तरी सर्व सभासदांनी याची नोंद घ्यावी.

सही /-
(निता पुगांवकर)
निवडणूक निर्णय अधिकारी

## निवडक

### पनवेलमध्ये तलावात आढळला मृतदेह

**पनवेल :** शहरातील तलावात इस्रायली तलावात २५ ते ३० वर्षीय वयोगटातील तरुणाचा मृतदेह शहर पोलिसांना आढळून आला आहे. पोलीस याच्या नातेवाइकांचा शोध घेत आहेत. २५ ते ३० वर्षीय वयोगटातील व्यक्तीने तलावात उडी मारली असे येथील नागरिकांनी सांगितले. त्याच्या डाव्या हातावर इंग्लिशमध्ये आकाश गोंदलेले आहे. तर मानेवर तीन स्टार आहेत. अधिक तपास शहर पोलीस करीत आहेत.

### नवी मुंबईतील हायस्कूलमध्ये वृक्षारोपण

**नवी मुंबई :** जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून ऐरोलीतील सेक्टर १ मधील माझिदून इंग्लिश हायस्कूलमध्ये वृक्षारोपण करण्यात आले. या वेळी विद्यार्थ्यांनी घोषवाक्य व पर्यावरण गीते सादर केली. वृक्षलागवडीमुळे एकाच नागरिकाला फायदा होत नाही, तर संपूर्ण पर्यावरणाला, सृष्टीला त्याचा फायदा होतो. त्यामुळे वृक्षांची लागवड करून त्याचे संवर्धन करणे ही नितांत गरज असल्याचे मत हायस्कूलचे संचालक सिरताज शेख यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाला शाळेच्या प्राचार्या रिबेका बिस्वास, कांचन बागवे, कल्याणी खराटे, दशरथ जगताप, महेंद्र राऊत, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

### वाशीत आज उद्योजकता सोहळा

**नवी मुंबई :** महाराष्ट्रातील मराठी उद्योजकांनी एकत्र यावे आणि एकमेकांना मदत करून व्यवसायवृद्धी करावी, यासाठी सॅटर्डे क्लब संस्था काम करीत आहे. या संस्थेचा १२ जुलै हा स्थापना दिवस मराठी उद्योजकता दिवस म्हणून साजरा केला जाणार आहे. केंद्रीय सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगमंत्री नारायण राणे यांच्या उपस्थितीत वाशीतील विष्णूदास भावे नाट्यगृहात मंगळवारी (दि. १२) हा कार्यक्रम होणार आहे, अशी माहिती संस्थेच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत संचालक अशोकराव दुगाडे यांनी दिली. या वेळी संतोष पाटील, अतुल अत्रे, श्रीकृष्ण पाटील आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# अनधिकृत पार्किंगमुळे डोकेदुखी

## नवी मुंबईत मुख्य रस्त्यावर वाहने केली जाताहेत उभी; वाहतूक कोंडीचा त्रास


(प्रातिनिधीक छायाचित्र)

**कोपरखैरणे ते वाशी विभागात मुख्य रस्त्यावरील अनेक बस थांब्यांसमोर खासगी वाहने उभे केली जातात. यामुळे प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागतो. वाहतूक विभागाने लवकरात लवकर कठोर कारवाई करावी.**

**–रोहन अब्राहम, प्रवासी**

**नवी मुंबई वाहतूक विभागाची बेकायदा पार्किंगवर कारवाई सुरूच असते. बस थांब्यासमोर, नो पार्किंगमध्ये अनधिकृतपणे उभ्या राहणाऱ्या वाहनांवर कठोर कारवाई करण्यात येईल.**

**–बापूराव देशमुख, पोलीस निरीक्षक, वाशी विभाग**

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

प्रवाशांच्या सुविधेसाठी नवी मुंबई महापालिका परिवहन विभागातर्फे शहरात ठिकठिकाणी बस थांबे उभारण्यात आले आहेत, मात्र काही बस थांब्यांसमोर बेकायदा वाहने पार्किंग केली जात असल्याने प्रवाशांसह बसचालकांना त्रास होत आहे. थांब्यांसमोर वाहने उभी असल्याने बस मुख्य रस्त्याच्या मधोमध उभी राहत असल्याने वाहतूक कोंडी होत असल्याचे पाहायला मिळत आहे.

वाशी, कोपरखैरणे या विभागात दाट लोकसंख्या असल्याने मोठ्या प्रमाणात वाहने ये-जा करतात. कोपरखैरणे ते वाशी या चार किलोमीटरच्या रस्त्यावर प्रवास करण्यासाठी ३० मिनिटांपेक्षा जास्त वेळ लागतो. नवी मुंबईत तीनपदरी रस्ते बनवण्यात आले असूनही वापरण्यायोग्य क्षेत्र फक्त एकाच मार्गिकेचे असते; इतर दोन मार्गिकांवर वाहने उभी केली जातात. त्याचबरोबर अनेक बस थांब्यावर बेकायदा कार, टेम्पो, दुचाकी वाहने पार्क केली जातात. त्यामुळे प्रवाशांचे हाल होत असून वाहतूक विभागाची कारवाई थंडावल्याचे चित्र आहे.

वाशी महामार्ग ते कोपरखैरणे आणि कोपरखैरणे ते वाशी महामार्गावर दोन्ही बाजूंच्या रस्त्याच्या कडेला असलेल्या प्रत्येक बसथांब्यावर नो पार्किंगच्या फलकासमोर गाड्या उभ्या असतात. कोपरखैरणेमध्ये वाहतूककोंडी ही रोजचीच समस्या झाली आहे. तुर्भे एपीएमसी मार्केट परिसरातदेखील अशीच परिस्थिती पाहायला मिळत आहे. यामुळे कामावरून थकून घरी जाणाऱ्या प्रवाशांना, तसेच बसचालकांना या वाहनांमुळे मोठा त्रास सहन करावा लागतो. या बेकायदा वाहनांवर कायदेशीर कारवाई करून ही समस्या सोडवण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात आली आहे.

# नवी मुंबईतील तरुणाचा विहिरीत बुडून मृत्यू

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई दिघा येथील सुमित मनोज माळी या १७ वर्षीय तरुणाचा कळवा पारसिक हिल येथील कारगिल डोंगरावरील विहिरीत पोहताना बुडून मृत्यू झाला.

शुक्रवारी सुमारे ७०० ते ८०० मीटर उंची असलेल्या डोंगरावर असलेल्या विहिरीमध्ये तो सहा मित्रांसोबत पोहण्यासाठी गेला होता. शनिवारी सकाळी साडेदहाच्या सुमारास त्याचा मृतदेह अंदाजे ३० ते ३५ फूट खोल असलेल्या विहिरीतून बाहेर काढण्यात आला. विहिरीच्या खोलीचा आणि पाण्याचा अंदाज न असल्याने तो बुडाला असावा अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे, अशी आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली.

कळवा पूर्व येथील कारगिल डोंगरावरील विहिरीत एकजण बुडल्याची माहिती शुक्रवारी सायंकाळी सव्वासातच्या सुमारास ठाणे महापालिका प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन कक्षाला मिळाली. त्यानंतर कळवा पोलीस कर्मचारी, सहायक आयुक्त (कळवा प्रभाग समिती), प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे अधिकारी व कर्मचारी, ठाणे आपत्ती प्रतिसाद दलाचे जवान, आपत्ती व्यवस्थापन कक्षातील स्विमर्स, तसेच ठाणे अग्निशमन दलाचे जवान १-रेस्क्यू वाहनासह तातडीने घटनास्थळी दाखल झाले.

हा प्रकार सुमारे ७०० ते ८०० मीटर उंचीवर असलेल्या डोंगरावरील विहिरीत घडला होता. त्यातच जाण्यासाठी अरुंद रस्ता असल्यामुळे व रात्रीच्या अपुऱ्या प्रकाशामुळे त्या ठिकाणी पोहचणे अशक्य होते. तसेच कळवा पोलीस कर्मचारी व कुटुंबीयांच्या परवानगीने शोधकार्य थांबविले होते. शनिवारी सकाळी ७:३० पासून शोधकार्य सुरू केले. तीन तासांच्या प्रयत्नानंतर सकाळी १०:३० च्या सुमारास युवकाचा मृतदेह विहिरीतून बाहेर काढला.

सुमित माळी सहा मित्रांसोबत पोहण्यासाठी गेला होता. विहीर ही अंदाजे ३० ते ३५ फूट खोल असून विहिरीच्या खोलीचा व पाण्याचा अंदाज न आल्यामुळे सुमित विहिरीमध्ये बुडाला असल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. असे आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून सांगण्यात आले. दरम्यान, मृतदेह डोंगरावरून खाली आणल्यानंतर मृतदेह कळवा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला.

# पनवेलमध्ये मिशन झिरो ड्रॉप आऊट मोहीम; शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण

**पनवेल : वार्ताहर**

मागील दोन वर्षांत शाळाबाह्य विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढले आहे, अशा बालकांचा शोध घेत त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण विभागाच्या वतीने पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर यांच्या अध्यक्षतेखाली शाळाबाह्य मुले शोध मोहिम राबविण्यात आली होती. या मोहिमेमध्ये २४६ शाळाबाह्य बालकांचा शोध घेऊन त्यांना दाखल करून घेण्यात आले आहेत.

तालुक्यातील प्राथमिक शिक्षक, माध्यमिक शिक्षक, अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची या सर्व्हेसाठी प्रगणक म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. या सभेमध्ये पनवेल पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी महेश खामकर, अधिव्याख्यता सुनिता राठोड, वरिष्ठ विस्तार अधिकारी सिताराम रामा मोहिते, एकात्मिक बाल विकास प्रकल्प पर्यवेक्षिका वनिता तांडेल व सर्व विषय साधनव्यक्ती उपस्थित होते.

तालुक्यातील संपूर्ण भागात ३ ते ६ वयोगटातील सर्वेक्षण करण्यासाठी महिला बाल विकास प्रकल्प यांच्या अधिकारी, अंगणवाडी सेविका, मदतनीस तसेच ६ ते १८ वयोगटातील सर्वेक्षण करण्यासाठी गटशिक्षणाधिकारी महेश खामकर, वरिष्ठ विस्तार अधिकारी सिताराम मोहिते, विषयसाधनव्यक्ती, पर्यवेक्षक म्हणून केंद्रप्रमुख त्या-त्या शाळेचे मुख्याध्यापक काम पाहणार आहेत. या सर्वेक्षणासाठी वेगवेगळ्या विभागाची मदत घेतली जाणार आहे.

अध्यक्ष तहसीलदार विजय तळेकर, सहअध्यक्ष गटविकास अधिकारी सुनिल भोये, सचिव म्हणून महेश खामकर गटशिक्षणाधिकारी हे काम पाहणार आहेत. या उपक्रमामुळे पनवेल तालुक्यात शिक्षणापासून वंचित राहिलेल्या मुलांना चांगलाच फायदा होणार आहे. सर्व नागरिकांना जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, ग्रामपंचायत सदस्य व स्वयंसेवी संस्थांना जाहीर आवाहन करण्यात येते की, आपल्या नजीकच्या परिसरात शाळाबाह्य मुले आढळल्यास नजीकच्या जिल्हा परिषदेच्या शाळेत अथवा पनवेल पंचायत समितीतील शिक्षण विभागास संपर्क करावा. जेणेकरून कोणतेही मुल शिक्षणाच्या हक्कापासून वंचित राहणार नाही.



# सानपाड्यात वृक्ष छाटणीस सुरुवात

## भाजपचे सुनील कुरकुटे यांच्या पाठपुराव्यास यश

**नवी मुंबई : बातमीदार**

सानपाडा प्रभाग क्रमांक २९ व ३० मध्ये वृक्षांच्या फांद्या वाढल्या आहेत. फांद्यांची छाटणी न झाल्याने या फ़ांद्या कोसळण्याची शक्यता होती. फांद्यांची छाटणी तातडीने करावी, अशी मागणी भाजपचे माजी 'ड' प्रभाग समिती सदस्य सुनील कुरकुटे यांनी शनिवारी नवी मुंबई महानगर पालिकेचे आयुक्त अभिजित बांगर यांच्याकडे केली होती. कुरकुटे यांच्या या मागणीला यश आले असून पालिकेने वृक्ष छाटणीस सुरुवात केली आहे.



सानपाडा प्रभाग क्रमांक २९ व ३० येथे मोठ्या प्रमाणात वृक्षांच्या फांद्या वाढलेल्या आहेत. पावसाळ्यापूर्वी मोठ्या प्रमाणात वाढलेल्या वृक्षांच्या फांदयाची छाटणी करणे गरजेचे असते, मात्र महापालिका अधिकाऱ्यांच्या उदासीनतेमुळ प्रभागातील वृक्षांच्या फांद्यांची अद्याप छाटणी करण्यात आलेली नाही. सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू आहेत. त्यामुळे भविष्यात मुसळधार पावसाच्या तडाख्याने येथील वृक्षांच्या फांद्या कोसळून एखादी मोठी जिवितहानी तसेच वित्तहानी होण्याची भीती प्रभागातील स्थानिक रहिवाशांकडून व्यक्त केली जात होती. याबाबत प्रभागातील स्थानिक रहिवाशांनी सुनील कुरकुटे यांच्याकडे तक्रारी केल्या होत्या. त्यामुळे स्थानिक रहिवाशांच्या तक्रारीच्या अनुषंगाने प्रभागात मोठ्या प्रमाणात वाढलेल्या वृक्षांच्या फांदयाची तत्काळ छाटणी करण्याची मागणी सुनील कुरकुटे यांनी महापालिका आयुक्तांकडे पत्रातून केली होती.

भविष्यात मुसळधार पावसाच्या तडाख्याने वृक्ष तसेच त्याच्या फांदया कोसळून एखाद्याचा जीव गेला तरच महापालिकेला जाग येईल का?, असा प्रश्न सुनील कुरकुटे यांनी या वेळी उपस्थित केला होता. महापालिकेने मोठ्या प्रमाणात वाढलेल्या वृक्षांच्या फांद्याची छाटणी करण्यास तात्काळ सुरुवात करावी; अन्यथा स्थानिक रहिवाशांना सोबत घेऊन जनआंदोलन छेडण्याचा इशाराही कुरकुटे यांनी महापालिका आयुक्तांना पत्रातून दिला होता.

# कंपनीत शिरलेल्या अजगराची सुटका

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

रबाळे एमआयडीसीतील एका कंपनीच्या कार्यालयात शिरलेल्या पाच फूट लांबीच्या अजगराला अम्मा केअर फाऊंडेशन आणि प्लांट अ‍ॅण्ड अ‍ॅनिमल्स वेल्फेअर सोसायटीच्या स्वयंसेवकांनी बाहेर काढले. त्यानंतर स्वयंसेवकाने त्याला जंगलात सोडले.

रबाळे एमआयडीसीतील ज्योती प्रोसेस इक्विपमेंट प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या कार्यालयात शुक्रवारी (दि. ८) सकाळी एक साप घुसला होता. याबाबतची माहिती ज्योती शिंदे यांच्याकडून मिळाल्यानंतर अम्मा केअर फाऊंडेशन आणि प्लांट अ‍ॅण्ड अ‍ॅनिमल्स वेल्फेअर सोसायटीचे स्वयंसेवक भूषण साळवे यांनी सदर कंपनीत धाव घेतली. त्यानंतर त्यांनी पाच फूट लांब असलेल्या बिनविषारी अजगराला सुखरूप बाहेर काढले. त्यानंतर त्यांनी या सापाची माहिती ठाणे येथील वन विभागाला दिल्यानंतर सापाची पशुवैद्यक डॉ. राहुल मेश्राम यांच्याकडून तपासणी करण्यात आली. त्यानंतर सापाला जंगलात सोडून देण्यात आल्याची माहिती मानद वन्यजीव रक्षक आणि एसीएफ आणि पीएडब्ल्यूएस मुंबईचे संस्थापक सुनीश सुब्रमण्यन यांनी दिली.

# नवी मुंबईसह मुंबईत चोऱ्या करणाऱ्या टकटक गँगच्या म्होरक्याला अटक

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

काचेवर टकटक करून अथवा पैसे पडल्याचे चालकांना सांगून मोटरगाडीतील महागड्या वस्तू चोरणाऱ्या टोळीच्या म्होरक्याला मुंबई पोलिसांनी तामिळनाडूतून अटक केली. त्यासाठी तब्बल दोनशेहून अधिक सीसीटीव्हीचे चित्रीकरण तपासून पोलिसांनी आरोपीची ओळख पटवली.

मुंबई व नवी मुंबई परिसरात सक्रिय असलेल्या या आंतरजिल्हा टोळीचा अनेक चोऱ्यांमध्ये सहभाग असल्याचा पोलिसांना संशय आहे. लक्ष्मण एस. कुमार (वय ३५) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. तो तामिळनाडू येथील रामजी नगर येथील मिल्क कॉलनीतील रहिवासी आहे.



तक्रारदार ओशिवरा पोलिसांच्या हद्दीतील आदर्श नगर पेट्रोल पंपासमोरील दुकानात१६ जूनला खरेदी करण्यासाठी गेले होते. ते त्यांच्या मोटारीत बसले असता एका अनोळखी व्यक्तीने त्यांच्या गाडीच्या डाव्या बाजूला टकटक करून बाजूला पैसे पडले असल्याचे सांगितले. तक्रारदार पडलेले पैसे उचलण्यासाठी गाडीच्या बाहेर उतरल्या असता आरोपीच्या दुसऱ्या साथीदाराने बाजूचा दरवाजा उघडून गाडीत ठेवलेली बॅग चोरली. या प्रकरणी ओशिवरा पोलिसांकडे तक्रार करण्यात आल्यानंतर ओशिवरा पोलिसांनी चोरीचा गुन्हा दाखल केला. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांच्या पथकाने याप्रकरणी तपास सुरूवात केला आहे.

आरोपीकडून अ‍ॅपल कंपनीचे मॅकबुक व लॅपटॉप, ब्लुटुथ स्पीकर असा लाखो रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. आरोपीविरोधात मुंबईतील माटुंगा व चेंबूर परिसरात अशाच प्रकारे चोरी केल्याचे दोन गुन्हे दाखल आहेत. आरोपीचे काही साथीदार मुंबई व नवी मुंबईत सक्रिय असल्याची माहिती चौकशीत मिळाली आहे. त्याबाबत पोलीस अधिक तपास करत आहेत.

# न्यू बॉम्बे सिटी स्कूलची वारकरी दिंडी उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**

घणसोलीतील न्यू बॉम्बे सिटी स्कूलमध्ये आषाढी एकादशीनिमित्त दिंडी सोहळ्याचे शनिवारी (दि. ९) आयोजन केले होते. शिक्षकवर्ग व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन या विठ्ठल नामाच्या शाळेत उत्साह भरला.



दीपप्रज्वलन, पालखीपूजन करून मान्यवरांच्या उपस्थितीत या सोहळ्यास सुरुवात झाली. यात चिमुकल्यांनी विठुरायाचा जयघोष करत उत्स्फुर्त सहभाग घेतला. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आषाढी एकादशीची माहिती दिली. लेझीम, फुगडी, ढोलाच्या गजरात हा सोहळा झाला. विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांची वेशभूषा केली होती. यातील लहानगे विठ्ठल-रखुमाई सर्वांचेच लक्ष वेधुन घेत होते. विशेष म्हणजे येथील नवीन वसाहत असलेल्या मेघमल्हार सोसायटीमध्ये या पालखी मिरवणुकीचे स्वागत करून विद्यार्थ्यांना फळवाटप करण्यात आले. लहानग्यांपासून थोरामोठ्यांपर्यंत सगळेच या विठ्ठल नामाचा गजरात दंगुन गेले होते.

या वेळी प्रमुख पाहूणे म्हणून घणसोली नागरी आरोग्य केंद्राच्या वैद्यकिय अधिकारी डॉ. वैशाली म्हात्रे उपस्थित होत्या. तसेच मराठी-सेमी माध्यम विभागाच्या मुख्याध्यापिका कविता भोसले, इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका सुरेखा पिसाळ, सीबीएसई विभागाच्या मुख्याध्यापिका अवनीत मिस यांच्यासह सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.

## विठ्ठल रखुमाईच्या वेषात निघाली वारी


**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळमध्ये आषाढी एकादशीनिमित्त वारी काढण्यात आली. यात नागरिकांनी उत्सफूर्त सहभाग नोंदवाला. तेरणा हॉस्पिटलपासून सुरू झालेली वारी ही विठ्ठल मंदिरापाशी येऊन संपली.

नेरूळ येथील आर्यवत फाउंडेशनच्या अध्यक्षा मंगल घरत यांनी या वारीचे आयोजन केले होते. यावेळी विठ्ठल रखुमाईच्या वेषात लहानगे तयार झाले होते. अनेक मुलींनी पारंपरिक मराठी नऊवारी नेसत शृंगार केला होता. तसेच अनेक महिलांनी तुळशी वृंदावन डोक्यावर घेतले होते. टाळ वाजवत अभंग म्हणत वारी काढण्यात आली.

या वेळी बालाजी कृपा हावरे, श्री गणेश सोसायटी व गुडविल सोसायटील नगरीक् यात सहभागी झाले होते. हल्लीच्या पिढीला पंढरपूर ला कशी वारी काढली जाते हे कळावे या उद्देशाने ही वारी काढण्यात आल्याचे मंगल घरत यांनी सांगितले.



# चांगल्या पावसामुळे मुरुडमध्ये शेतीच्या कामांना आला वेग

(छाया : संजय करडे)



**मुरूड : प्रतिनिधी**

पावसाने मुरूड तालुक्यात दमदार हजेरी लावली असून, आतापर्यंत समाधानकारक पाऊस झाल्याने शेतकरी राजा सुखावला आहे. जुलै महिन्यात झालेल्या या पावसामुळे शेतात पाणी साचल्याने मुरूड परिसरातील शेतकऱ्यांनी सोमवार (दि. ११) पासून लावणीला सुरुवात केली आहे. मुरुडमध्ये आतापर्यंत सरासरी १०८९ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

मुरूड तालुक्यातील ३९०० हेक्टर क्षेत्रावर भात पिकाची लागवड केली जाते. तालुक्यात प्रामुख्याने सुर्वणा, रुपाली, कर्जत २ व ५ ,८, जया या वाणाची लागवड मोठया प्रमाणावर केली जाते. तालुक्यात सुरुवातीपासूनच भात शेतीला अनकूल पाऊस झाल्याने पेरणी केल्यानंतर अवघ्या पंचवीस दिवसातच भाताची रोपे योग्य प्रकारे वाढली आहेत. मागील तीन दिवसांपासून पावसाचे प्रमाण कमी झाले आहे.

मात्र अगोदर पडलेल्या पावसामुळे शेतामध्ये पाणी साचले आहे. त्यामुळे तालुक्यातील शेकऱ्यांनी भातपिक लावणीला सुरुवात केली आहे.

लावणीसाठी काही ठिकाणी नांगर तर काही ठिकाणी यंत्राच्या सहाय्याने नांगरणी करण्यात येत आहे. मजुरीने माणसे घेऊन भातपिकाची लावणी करण्याचा कल अधिक प्रमाणात दिसून येत आहे.

# पाली सबपोस्ट ऑफिसमध्ये पाच जागा रिक्त

## अपुरे कर्मचाऱ्यांसह सुविधांअभावी नागरिकांची गैरसोय

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्याचे मुख्यालय असलेल्या पाली येथील सबपोस्ट ऑफिसमध्ये (उप डाकघर) कर्मचाऱ्यांची वानवा आहे. येथे एक पोस्टमास्तर व चार क्लार्क या पाच जागा रिक्त आहेत. परिणामी उपलब्ध कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा बोजा पडत आहे. तसेच लवकर काम न झाल्याने नागरिकांना एका कामासाठीसुद्धा कित्येक तास खोळंबावे लागते. शिवाय अपुऱ्या सोयी सुविधांमुळे नागरिकांची गैरसोय होत आहे. अपुरे कर्मचाऱ्यांमुळे राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र, सेव्हिंग खाती व विविध योजनांचा लाभ मिळण्यास दिरंगाई होत असल्याने नागरिक व खातेदार संतापले आहेत.

पाली सबपोस्ट ऑफिसमधील आधार कार्ड नोंदणी केंद्र अपुऱ्या सेटअपमुळे गेली अनेक महिने बंद पडले आहे. त्यामुळे नागरिकांना आधार कार्ड नोंदणी अपडेट करता येत नाही. तसेच मागील दीड वर्षांपासून येथील जनरेटर बंद आहे. परिणामी वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर पोस्ट ऑफिसमधील सर्व कामे ठप्प होत आहेत. पावसाळ्यात वीजपुरवठा वारंवार खंडित होतो. त्यामुळे येथील जनरेटर लवकर दुरुस्त करावा, अशी मागणी ॲड. नोवेल चिंचोलकर यांनी केली आहे.

रिक्त पदांमुळे उपलब्ध कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा बोजा पडत आहे. अनेक कामांना विलंब होतो. लवकर काम न झाल्याने नागरिकांना एका कामासाठीसुद्धा कित्येक तास खोळंबावे लागते. मनिऑर्डर, स्पीडपोस्ट, पार्सल देणे किंवा घेणे, पोस्ट तिकीट, लिफाफा, पोस्टकार्ड घेणे, पैसे जमा करणे अशा छोट्या कामांसाठीदेखील खूप वेळ जातो. राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र, बचत खाते व विविध योजनांचा लाभ मिळतांनादेखील दिरंगाई होते.

(छाया : धम्मशील सावंत)



**पाली पोस्ट ऑफिसमध्ये अपुऱ्या सोयीसुविधा असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे. शासनाने याची दखल घेऊन सोयीसुविधा पुरवाव्यात. तसेच रिक्त जागादेखील भरण्यात याव्यात.**
**–ॲड. नोवेल चिंचोलकर, पाली**

**पाली उपडाकघर कार्यालयातील आधार कार्ड नोंदणी केंद्रात अपुऱ्या वस्तू अभावी ते बंद आहे. त्या संदर्भात व रिक्त पदांसंदर्भात अनेक वेळा जिल्हा पोस्ट कार्यालयात पत्रव्यवहार केला आहे. मात्र अजूनही त्याची दखल घेतली गेली नाही. कार्यालयातील बंद अवस्थेत असलेला जनरेटर लवकरच सुरू करण्यात येईल.**
**–सरोजा रुमडे, पोस्ट मास्तर, पाली**



# खालापुरात मोबाइल चोरीच्या दोन घटना

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यात मोबाइल चोरांचा सुळसुळाट झाला असून, दोन चोरीच्या घटनेत पन्नास हजार रुपये किंमतीचे मोबाइल चोरीला गेले आहेत.

पहिल्या घटनेत नारपोली पनवेल येथील पर्यटक चौक येथील भिलवले धरण परिसरात फिरण्यासाठी आले होते. बंधाऱ्याच्या रोडवर गाडी उभी करुन ते धरणावर फिरत असताना, दुचाकीवरून आलेल्या दोन अनोळखी इसमांनी गाडीच्या खिडकितून ३६ हजार रुपये किमतीचा ॲपल कंपनीचा मोबाइल चोरुन नेला. याबाबत खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस नाईक सचिन व्हसकोटी करीत आहेत.

दुसऱ्या घटनेत शास्त्रीनगर खोपोली येथील फिर्यादीने पहाटे पाचला उठून घराच्या बाजूला असलेल्या नाल्यात पावसाचे किती पाणी आहे, याची पाहणी केली, त्यानंतर दरवाजा न लावता घरात येवून परत झोपले. घराचा दरवाजा उघडा राहिल्याचे पाहून चोरट्यांनी १३ हजार रुपये किंमतीचा मोबाईल चोरून नेला. याबाबत खोपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस हवालदार एस. थळे करीत आहेत.

# माथेरान जुम्मापट्टीजवळ पुरातन वटवृक्ष कोसळला

(छाया : विजय मांडे)



**कर्जत : प्रतिनिधी**

माथेरान–नेरळ घाटरस्त्यावर सायंकाळी साडेचार वाजण्याच्या सुमारास सुमारे शंभर वर्षापूर्वीचे मोठे वडाचे झाड कोसळले. सुदैवाने कोणतीही जीवित किंवा वित्त हानी झाली नाही.

माथेरानमध्ये गेल्या आठ दिवसांपासून जोरदार पाऊस पडत आहे. त्यामुळे घाटातील धबधबे मोठ्या प्रमाणात कोसळताना दिसत आहेत. धबधब्याच्या आकर्षणामुळे माथेरानमध्ये पर्यटक येत असल्याने नेरळ–माथेरान घाटात वाहतूक वाढली आहे. शनिवार–रविवार असल्याने माथेरानमध्ये पर्यटकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. घाटात वाहतूक सुरू असतांना जुम्मापट्टीजवळ वडाचा मोठा वृक्ष मुळापासून उमळून रस्त्यावर पडला. त्यावेळेस कुठलेही वाहन येत–जात नसल्याने सुदैवाने जीवित किंवा वित्तहानी झाली नाही. टपरी वजा हॉटेलसमोर वटवृक्ष पडला. परंतु हॉटेलचे कुठल्याही प्रकारचे नुकसान न झाल्याने हॉटेल चालकाने सुटकेचा निश्वास सोडला.

वृक्ष पडल्याचे समजाच समोरील गावातील आदिवासी बांधव तसेच टॅक्सी चालक मदतीला धावून गेले. छोटा रस्ता बनवून एकेरी वाहतूक चालू केली. जेसीबीच्या सहाय्याने वृक्ष बाजूला केल्यानंतर तब्बल दोन तासानी या घाटरस्त्यावरील वाहतूक सुरळीत झाली.

# कर्जतमधील शिबिरात ४० जणांचे रक्तदान

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत मेडिकल असोसिएशन आणि रायगड मेडिकल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आणि कल्याण येथील समर्पण रक्तपेढीच्या सहकार्याने येथील उपजिल्हा रुग्णालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ४० जणांनी रक्तदान केले. सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांनी संयोजित केलेले हे ४५४ वे शिबिर होते.

डॉ. शर्वाणी कुलकर्णी यांनी सर्वप्रथम रक्तदान करून रक्तदानाचा शुभारंभ केला. या शिबिरात सुनील शिंदे यांनी आपले ८१ वे रक्तदान केले तर त्यांची कन्या तृप्ती शिंदे हिने आपले पहिले रक्तदान करून राष्ट्रीय कर्तव्य बजावले. समर्पण रक्तपेढीच्या डॉ. सोनाली देसाई, राजशेखर नायर, कीर्ती सिंग, प्रफुल देसाई आदींनी रक्त संकलनाचे काम केले.

कर्जत मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. नितीन भोपतराव, डॉ. आशुतोष कुलकर्णी, डॉ. आदित्य जंगम, डॉ. नितीन आरेकर, डॉ. आशिष कर्वे, डॉ. संगीता दळवी, विकास चित्ते आदी या वेळी उपस्थित होते.

(छाया : विजय मांडे)



# रोह्यात पावसाचा जोर कायम

## कुंडलिका नदीने इशारा पातळी ओलांडली

**रोहे : प्रतिनिधी**

शहरासह रोहा तालुक्यातील ग्रामीण भागात पावसाचा जोर कायम असल्याचे सोमवारी (दि. ११) दिसून आले आहे. सोमवार सकाळपासून अधुनमधून पावसाच्या जोरदार सरी येत होत्या. वातावरण ढगाळ होते.

जुलै महिन्याच्या पहिल्या व दुसऱ्या आठवड्यात पावसाचा जोर कायम राहिल्याने शेतीला अनकूल पाऊस झाला आहे. त्यामुळे शेतीची कामे जोरात सुरू आहेत.

रोहा तालुक्यातील मेढा, सानेगाव, चणेरा, घोसाळे, धाटाव, कोलाड, सुतारवाडी, खांब, देवकान्हे, पिंगळसई आदी परिसरात आतापर्यंत चांगला पाऊस झाला आहे.डोंगर–दऱ्यातून नदी, नाले भरुन वाहत आहेत. कुंडलिका नदी दुथडी भरून वाहत आहे. सोमवारी सायंकाळी कुंडलिका नदीने इशारा पातळी ओलांडली होती.

(छाया : महादेव सरसंबे)



# पीक विमा योजनेत सहभागी व्हावे

## मुरूड तालुका कृषी अधिकाऱ्यांचे आवाहन

**मुरूड : प्रतिनिधी**

राज्य शासनाने खरीप हंगामात प्रधानमंत्री पिक विमा योजना राबविण्यास मान्यता दिली असून, मुरूड तालुक्यात भारतीय कृषी विमा कंपनीकडून या योजनेची अंमलबजावणी होणार आहे. या योजनेत सहभागीसाठी ३१ जुलैपर्यंत मुदत असून अधिकाधिक शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी मनिषा भुजबळ यांनी केले आहे.

या योजनेत खरीप हंगामासाठी भात पिकाचा समावेश असून मुरूड तालुक्यातील सर्व मंडळांना ही योजना लागू आहे. अधिसूचित क्षेत्रात अधिसूचित पिके घेणारे (कुळाने अगर भाडेपट्टीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांसह) सर्व शेतकरी या योजनेत पात्र आहेत. ही योजना कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक राहील. खरीप हंगामासाठी विमा हप्ता दोन टक्के आहे.



संग्रहित छायाचित्र

**■ वेबपोर्टलवर अर्जाची सुविधा उपलब्ध**

**बिगर कर्जदार शेतकरी विमा संरक्षणासाठी वेब पोर्टलद्वारे थेट अर्ज भरू शकतील. त्यासाठी पिक विमा पोर्टल या संकेत स्थळावर ऑनलाइन अर्ज उपलब्ध केले आहेत. विमा हप्त्याची रक्कम पेमेंट गेटवेद्वारे ऑनलाइन भरावयाची आहे.**

**■ प्रस्तावासाठी आवश्यक कागदपत्रे**

**शेतकऱ्यांना विमा प्रस्ताव दाखल करण्यासाठी सातबारा उतारा, आधार कार्ड, मोबाइल, बँक खात्याचा तपशील जोडणे आवश्यक आहे. पेरणी झाली असल्यास पेरणी केलेले स्वयंघोषणापत्र सादर करून प्रत्यक्ष इलेक्ट्रॉनिक स्वाक्षरी विमा प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.**

# मनसे विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष अमित ठाकरे यांनी पेणमध्ये साधला पत्रकारांशी संवाद

**पेण : प्रतिनिधी**

मनसे विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष अमित ठाकरे यांनी संघटना मजबूत करण्याच्या दृष्टीकोणातून संपर्क अभियान सुरु केला असून रविवारी (दि. १०) त्यांचे पेणमध्ये फटाक्याच्या आतषबाजीत मनसे पदाधिकाऱ्यांनी स्वागत केले. यावेळी बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून रॅली काढण्यात आली होती. त्यांनतर छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यास अमित ठाकरे यांनी अभिवादन केले.

मनसेचे रायगड जिल्हाध्यक्ष जितेंद्र पाटील, गोवर्धन पोलसानी, पेण तालुकाध्यक्ष रुपेश पाटील, संदीप ठाकूर, महेश पोरे, सुदेश संसारे, महिला शहराध्यक्षा निकिता पाटील, सपना देशमुख, शालोम पेणकर, प्रकाश मनोरे, ऋषी कोळी आदींसह मनसे व विद्यार्थी संघटनेचे पदाधिकारी या वेळी उपस्थित होते.

पदाधिकाऱ्यांच्या बैठकीपूर्वी अमित ठाकरे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. माझा हा कोकण दौरा असून राज्यात मनसेची विद्यार्थी संघटना कार्यरत आहे. या संपर्क अभियानातून विद्यार्थी संघटना मजबूत करणे आणि विद्यार्थ्यांच्या समस्या जाणून यासाठी मी येथे आलो असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. १ ऑगस्टपासून टप्प्याटप्प्याने विद्यार्थी संघटनेची कमिटी स्थापन करण्यात येणार असल्याची माहिती अमित ठाकरे यांनी या वेळी दिली.

आतापर्यंत झालेल्या दौऱ्यात युवक–युवतींचा चांगल्या प्रकारे प्रतिसाद मिळत असून मनसे विद्यार्थी संघटना पुन्हा एकदा जोमाने काम करेल, असा विश्वास अमित ठाकरे यांनी या वेळी व्यक्त केला.

(छाया : अनिस मनियार)



# पेणमधील वढाव येथे वृक्षारोपण

**पेण : प्रतिनिधी**



माझी वसुंधरा योजनेअंतर्गत वढाव ग्रामपंचायतीच्या वतीने सरपंच पूजा पाटील यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या वेळी ग्रामपंचायतीमार्फत ५०० बाबूंची रोपे व ३०० इतर रोपे आणून तुकारामवाडी व भाल रस्त्याला रोपांची लागवड करण्यात आली तसेच शेतकऱ्यांच्या शेतीच्या बांधावर व अंगणात लावण्यासाठी रोपांचे वाटप करण्यात आले.

पेणचे ग्रामविकास अधिकारी राजेंद्र गुडदे, ग्रामपंचायत सदस्य नीलिमा म्हात्रे, सविता म्हात्रे, नितेश म्हात्रे, निलेश म्हात्रे तसेच कल्पेश म्हात्रे यांच्यासह विद्यार्थी, मुख्याध्यापक, शिक्षक व ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते.

# ओंकार विद्या मंदिर शिक्षक पालक संघाच्या उपाध्यक्षपदी सागर राऊत यांची निवड

**मुरूड : प्रतिनिधी**

हदू एज्युकेशन सोसायटीच्या मुरूड येथील ओंकार विद्या मंदिर शाळेच्या शिक्षक–पालक संघाच्या उपाध्यक्षपदी सागर दामोदर राऊत यांची एकमताने निवड करण्यात आली.



ओंकार विद्या मंदिर शाळेच्या शिक्षक–पालक संघाची वार्षिक सभा रविवारी (दि. १०)आयोजित करण्यात आली होती. सोसायटीचे चेअरमन दिलीप जोशी, सुनील विरकूड, ओंकार विद्या मंदिराच्या अध्यक्षा दिपाली जोशी ओंकार, सदस्या उषा खोत, मनिषा फाटक यांच्यासह शिक्षक व दिडशेहून अधिक पालक या सभेला उपस्थित होते.

ओंकार विद्या मंदिरच्या मुख्याध्यापिका सविता गार्डी यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचन केले तसेच विविध शालेय उपक्रमाची माहिती दिली. या वेळी शिक्षक पालक संघाच्या उपाध्यक्षपदी सागर राऊत, उपसचिव भाग्यश्री हेरंब जोशी यांची निवड करण्यात आली.

# विम्बल्डनमध्ये जोकोव्हिचचे वर्चस्व कायम

- सलग चौथ्यांदा व एकूण सातव्यांदा जिंकली स्पर्धा
- २१व्या ग्रँडस्लॅम जेतेपदावर कब्जा



**लंडन : वृत्तसंस्था**

सर्बियाचा अग्रमानांकित टेनिसपटू नोव्हाक जोकोव्हिचने प्रतिष्ठेच्या विम्बल्डन स्पर्धेत रविवारी (दि. १०) सलग चौथ्या जेतेपदावर कब्जा केला. ऑस्ट्रेलियाच्या निक किरियॉसवर चार सेटमध्ये मात करीत जोकोव्हिचने कारकीर्दीतील २१व्या ग्रँडस्लॅम जेतेपदावर नाव कोरले तसेच विम्बल्डन स्पर्धा जिंकण्याची ही तब्बल सातवी वेळ ठरली.

ऐतिहासिक सेंटर कोर्टवर झालेल्या पुरुष एकेरीच्या अंतिम सामन्यात जोकोव्हिचने किरियॉसला ४-६, ६-३, ६-४, ७-३ (७-३) असे पराभूत केले. जोकोव्हिचने उपांत्यपूर्व आणि उपांत्य फेरीपाठोपाठ अंतिम सामन्यातही पहिला सेट गमावला. किरियॉसने एकदा जोकोव्हिचची सर्व्हिस तोडत पहिला सेट ६-४ अशा फरकाने जिंकल्यामुळे त्याच्या पहिल्या ग्रँडस्लॅम जेतेपदाच्या आशा पल्लवित झाल्या होत्या, मात्र जोकोव्हिचने खेळ उंचावत आक्रमणाची गती वाढवल्यानंतर किरियॉसने चुका करण्यास सुरुवात केली.

दुसऱ्या सेटच्या चौथ्या गेममध्ये जोकोव्हिचने किरियॉसची सर्व्हिस तोडत ३-१ अशी भक्कम आघाडी मिळवली. मग पुढे आपली सर्व्हिस राखत ४-१ अशी आघाडी वाढवली. यानंतर दमदार सर्व्हिससाठी ओळखल्या जाणाऱ्या किरियॉसला पुनरागमन करणे शक्य झाले नाही आणि जोकोव्हिचने हा सेट ६-३ अशा फरकाने जिंकत सामन्यात बरोबरी साधली.

तिसऱ्या सेटमध्ये दोन्ही खेळाडूंनी संघर्षपूर्ण खेळ केल्यामुळे ४-४ अशी बरोबरी होती, मात्र जोकोव्हिचने मोक्याच्या क्षणी आक्रमकता दाखवत पुन्हा किरियॉसची सर्व्हिस तोडली. मग आक्रमक वृत्तीच्या किरियॉसच्या चेहऱ्यावर निराशा दिसत होती. जोकोव्हिचने दर्जेदार खेळ सुरू ठेवत तिसरा सेट ६-४ असा आपल्या नावे केला.

चौथ्या सेटमध्ये दोन्ही खेळाडूंनी अप्रतिम खेळ केला. किरियॉसने हार न मानण्याच्या वृत्तीचे दर्शन घडवले, परंतु दुसऱ्या बाजूने जोकोव्हिचनेही अनुभव पणाला लावला. त्यामुळे या सेटमध्ये ६-६ अशी बरोबरी झाली. त्यानंतर बरोबरी कोंडी फोडण्यासाठी झालेल्या टायब्रेकरमध्ये जोकोव्हिचने ७-३ अशी सरशी साधत वर्षांतील पहिले जेतेपद पटकाविले.

# अखेरच्या टी-२० सामन्यात इंग्लंड विजयी

## सूर्यकुमारच्या शतकानंतरही भारतीय संघाचा पराभव

**नॉटिंगहॅम : वृत्तसंस्था**

सूर्यकुमार यादवच्या (५५ चेंडूंत ११७ धावा) दिमाखदार शतकानंतरही भारतीय संघाला रविवारी तिसऱ्या आणि अखेरच्या ट्वेन्टी-२० क्रिकेट सामन्यात इंग्लंडकडून १७ धावांनी पराभव पत्करावा लागला, मात्र पहिल्या दोन सामन्यांत विजय मिळवल्याने पाहुण्या भारताने या मालिकेत २-१ अशी सरशी साधली.

इंग्लंडने दिलेल्या २१६ धावांच्या लक्ष्याचा कर्णधार रोहित शर्मा (११), विराट कोहली (११) आणि ऋषभ पंत (१) लवकर बाद झाल्याने भारताची तीन बाद ३१ अशी स्थिती झाली. मग सूर्यकुमार आणि श्रेयस अय्यर (२८) या मुंबईकर फलंदाजांनी भारताचा डाव सावरताना चौथ्या गड्यासाठी ११९ धावांची भागीदारी रचली. अय्यरला रीस टॉपलीने बाद करीत ही जोडी फोडली. दरम्यान, सूर्यकुमारने आंतरराष्ट्रीय कारकीर्दीतील पहिले शतक साजरे केले. त्याने शतकी खेळीत १४ चौकार आणि सहा षटकार लगावले. इतर फलंदाजांची त्याला फारशी साथ न लाभल्याने भारताला २० षटकांत नऊ बाद ९८ धावाच करता आल्या.







पनवेल : तालुक्यातील कामोठे येथे झालेल्या रायगड जिल्हास्तरीय थाय बॉक्सिंगमध्ये पेण तालुक्यातील जिते येथील श्रावणी दिलीप म्हात्रे हिने प्रथम क्रमांक पटकाविला. त्याबद्दल तिचे अभिनंदन करण्यात आले.

# ९४ वर्षीय आजींना जागतिक स्पर्धेत 'सुवर्ण'

**फिनलंड : वृत्तसंस्था**

९४ वर्षांच्या भगवानी देवी डागर यांनी फिनलंडमध्ये सुरू असलेल्या वर्ल्ड मास्टर्स ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप २०२२ स्पर्धेमध्ये १०० मीटर स्प्रिंट (वेगात चालणे) प्रकारात सुवर्णपदक जिंकले आहे. त्यांच्या या कामगिरीमुळे सर्वजण चकित झाले आहेत.



भगवानी देवी यांनी १०० मीटर अंतर २४.७४ सेकंदात पार केले. याशिवाय गोळाफेक प्रकारातही सहभाग घेतला होता. तिथेही त्यांनी कांस्यपदक मिळविले आहे. त्यांच्या या कामगिरीचे भरपूर कौतुक होत आहे. युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाने ट्विटर अकाऊंटवर त्यांचा फोटो पोस्ट करून कौतुक केले आहे.

विशेष म्हणजे चेन्नई येथे झालेल्या नॅशनल मास्टर्स ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्येही भगवानी देवींनी तीन सुवर्णपदके जिंकली होती. या कामगिरीच्या बळावर त्यांनी वर्ल्ड मास्टर्स ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये प्रवेश मिळविला होता.

# सूर्यकुमार यादव रोहित-रैनाच्या पंक्तीत

**मुंबई : प्रतिनिधी**

इंग्लंडविरुद्ध नॉटिंगहॅम येथे झालेल्या तिसऱ्या टी-२० सामन्यात भारताच्या सूर्यकुमार यादवने २४व्या आंतरराष्ट्रीय सामन्यात पहिले शतक झळकाविले. त्याने ४८ चेंडूत १२ चौकार आणि पाच षटकारांच्या मदतीने शतक पूर्ण केले. सूर्यकुमार यादव टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये शतक झळकावणारा भारताचा पाचवा खेळाडू ठरला आहे. त्याच्या आधी सुरेश रैना, रोहित शर्मा, केएल राहुल आणि दीपक हुड्डा यांनी ही कामगिरी केली आहे.

२१६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताची सुरुवात खराब झाली. ऋषभ पंत (१), विराट कोहली (११), कर्णधार रोहित शर्मा (११) आणि दिनेश कार्तिक (६) लवकर पॅव्हेलियनमध्ये परतले, परंतु सूर्यकुमारने अवघ्या ४८ चेंडूंत शतक झळकाविले. चौथ्या क्रमांकावर शतक झळकाविणारा तो केएल राहुलनंतर दुसरा भारतीय फलंदाज ठरला.








# अभिषेक-ज्योतीला जागतिक तिरंदाजी स्पर्धेत कांस्यपदक

**बर्मिंगहॅम : वृत्तसंस्था**



अभिषेक वर्मा आणि ज्योती सुरेखा वेन्नम या भारतीय जोडीने रविवारी जागतिक क्रीडा स्पर्धेतील मिश्र कंपाऊंड तिरंदाजीत कांस्यपदक पटकाविले.

अभिषेक-ज्योती जोडीने पहिल्या फेरीत अचूक वेध साधताना १० गुणांची कमाई करण्याची दमदार कामगिरी केली, मात्र आंद्रेया बेकेरा आणि मिग्वाइल बेकेरा या मेक्सिकन जोडीने दुसऱ्या फेरीत चमक दाखवत सामना बरोबरीत आणला. मग अभिषेक आणि ज्योतीने तिसऱ्या फेरीत पुन्हा अचूक वेध साधला तसेच भारतीय जोडीने अखेरच्या फेरीतही दमदार खेळ सुरू ठेवत कांस्यपदक मिळविले.







हे दैनिक मल्हार नेटवर्क प्रा. लि. च्या वतीने कृष्णा चांगु ठाकुर यांनी सिद्धकला प्रिंट मिडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., ॲट प्लॉट नं. डब्ल्यू-२३०, टी.टी. सी. इंडस्ट्रियल एरिया, खैरणे एम.आय.डी.सी., ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई -४००७१०, ठाणे जिल्हा, महाराष्ट्र येथे मुद्रीत करून शॉप नं. ४, ॲस्पायर प्राईड, प्लॉट नं. २२७, निअर रुपाली सिनेमा, पनवेल, जिल्हा - रायगड, पिन - ४१०२०६, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. ✲ संपादक : देवदास लक्ष्मण मटाले ✲ E-mail : ramprahar@gmail.com ✲ RNI Regn. No. MAH MAR/2008/26534.

"Printed and Published by **Krishna Changu Thakur** on behalf of **Malhar Network Pvt. Ltd.** and Printed at **Siddhakala Print Media and Publications Pvt Ltd. Plot No. W 230, T. T. C. Industrial Area, Khairne MIDC, Thane Belapur Road, Navi Mumbai - 400 710, Thane Dist, Maharashtra** and published from **Shop No. 04, Aspire Pride, Rupali Cowk, Panvel, Navi, Mumbai 410 206, Panvel, Raigarh- 410206, Maharashtra. RNI Regd. No. MAHMAR/2008/26534, Editor : Devdas Laxman Matale**